सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २५५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## याच्या तळाशी जाऊ कोणालाही सोडणार नाही

### दिल्ली बॉम्बस्फोटाचा कट रचणाऱ्यांना पंतप्रधान मोदींचा स्पष्ट इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११नवी दिल्ली**

सोमवारी संध्याकाळी राजधानी दिल्लीत झालेल्या स्फोटाने संपूर्ण देशाला हादरवून सोडलं आहे. दिल्लीतील लाल किल्ला परिसरात कारमध्ये झालेल्या स्फोटात १२ जणांचा मृत्यू झाला तर अनेकजण जखमी झाले आहेत. या स्फोटानंतर तपास यंत्रणा सतर्क झाल्या असून आरोपींचा शोध सुरु करण्यात आला आहे. दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. दिल्ली बॉम्बस्फोटातील गुन्हेगारांना सोडले जाणार नाही, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले. ते सध्या भूतानच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी भाषण देताना त्यांनी दिल्ली स्फोटातील दोषींवर कडक कारवाई करणार असल्याचे म्हटले.

भाषणाची सुरुवात करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, मी आज जड अंतःकरणाने येथे आलो आहे. काल संध्याकाळी दिल्लीत घडलेल्या भयानक घटनेने



सर्वांना खूप दुःख झाले आहे. मी पीडित कुटुंबाचे मला दुःख मला समजत आहे. संपूर्ण देश त्यांच्यासोबत आहे. या घटनेचा तपास करणाऱ्या सर्व तपास यंत्रणांशी आणि त्यात सहभागी असलेल्या सर्व प्रमुख लोकांशी मी काल रात्रभर संपर्कात होतो. चर्चा सुरू होती आणि माहिती एकत्र केली जात होती. आमच्या तपास यंत्रणा या कटाच्या तळाशी जातील. यातील गुन्हेगारांना सोडले जाणार नाही.

## स्फोटकांनी भरलेली कार ३ तास एकाच ठिकाणी उभी

### स्फोट घडवणाऱ्याने एका मिनिटासाठीही गाडी सोडली नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११नवी दिल्ली**

दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ सोमवारी संध्याकाळी झालेल्या स्फोटाने संपूर्ण देशाला हादरवून टाकले. या घटनेमुळे अनेक राज्यांमध्ये पसरलेल्या दहशतवादी नेटवर्कशीही त्याचा संबंध असल्याचे दिसून येत आहे. तपास संस्थांकडून मिळालेल्या प्राथमिक अहवालात या स्फोटात उच्च दर्जाचे स्फोटक, अमोनियम नायट्रेट वापरण्यात आले होते. पांढऱ्या रंगाच्या ह्युंदाई आय२० कारमध्ये झालेल्या भीषण स्फोटात आठ जणांचा मृत्यू झाला आणि २० जण गंभीर जखमी झाले. पोलिसांनी युएपीए कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे आ. ज्या कारमध्ये स्फोट झाला त्या कारचे



सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे, ज्यामध्ये एक संशयित आत बसलेला दिसत आहे.

लाल किल्ला स्फोटाच्या चौकशीत पुलवामा येथील एका रहिवाशाचा शोध लागला आहे, ज्याने २९ ऑक्टोबर रोजी स्फोट घडवून आणणारी हुंडई आय२० कार खरेदी केली होती. तपासकर्त्यांनी अद्याप त्याची ओळख सार्वजनिक केलेली नसली तरी तो ३४ वर्षांचा असल्याची माहिती समोर आली आहे. स्फोटानंतर काही तासांत, पोलिसांनी गुडगाव येथील एका रहिवाशाची चौकशी केली ज्याच्या नावावर ही कार होती. त्या व्यक्तीने सांगितले की त्याने ती गाडी दुसऱ्या कोणाला तरी विकली होती आणि त्यानंतर पोलिसांनी सध्याचा मालकाचा शोध घेण्यास सुरुवात केली. दोन वेळा ही कार विकली गेली आणि शेवटी ती काश्मीरच्या पुलवामा येथील रहिवाशाकडे गेली.

प्राथमिक तपासात स्फोट झालेली कार लाल किल्ल्याजवळ तीन तासांहून अधिक काळ उभी होती आणि त्यानंतर ती बाहेर पडली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये सोमवारी दुपारी ३:१९ वाजता लाल किल्ल्याजवळील पार्किंगमध्ये कार प्रवेश करत असल्याचे आणि सायंकाळी ६:४८ वाजता बाहेर पडताना दिसून आले आहे. कार पार्किंगमधून बाहेर पडली तेव्हा प्रचंड वाहतूक होती. दर्या गंज, लाल किल्ला परिसर, कश्मीरी गेट आणि सुनेहरी मशिदीजवळही ही कार दिसली होती.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये, कठ २६उए७६७४ क्रमांकाची गाडी दुपारी ३:१९ वाजता लाल किल्ल्याच्या पार्किंगमध्ये दाखल झाली. ती संध्याकाळी ६:३० वाजेपर्यंत तिथेच उभी होती. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चालक एकदाही गाडीतून बाहेर पडला नाही. तो गाडीच्या आतच बसून राहिला. पोलिसांनी एका मिनिटाचा सीसीटीव्ही व्हिडिओ मिळवला आहे ज्यामध्ये कार बदरपूर सीमेवरून जाताना स्पष्टपणे दिसत आहे. दुसऱ्या व्हिडिओमध्ये ड्रायव्हर हात खिडकीतून बाहेर काढताना दिसत आहे. तो निळा आणि काळा टी-शर्ट घातलेला दिसत आहे. पोलिस आता कारच्या संपूर्ण मार्गाची चौकशी करत आहेत. पार्किंगमधील सीसीटीव्ही फुटेजमध्ये ड्रायव्हरच्या सीटवर बसलेला एक व्यक्ती पार्किंग स्लिप घेत असल्याचे दिसत आहे.


## दिल्ली बॉम्बस्फोटानंतर महाराष्ट्रात हाय अलर्ट

### प्रमुख शहरांमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था; मंदिरे, रेल्वे स्टेशन, विमानतळांवर सुरक्षा वाढवली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई**

राजधानी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ सोमवारी (१० नोव्हेंबर) संध्याकाळी झालेल्या भीषण कार स्फोटानंतर महाराष्ट्रात हाय अलर्ट जारी करण्यात आली आहे. देश हादरवणाऱ्या या स्फोटात नऊ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी आहेत. स्फोटानंतर केंद्रीय गुप्तचर यंत्रणांकडून देशातील सर्व राज्यांना सुरक्षा वाढवण्याचे निर्देश दिले गेले असून महाराष्ट्र पोलिस यंत्रणा युद्धपातळीवर सतर्क झाली आहे. राज्यात महत्वाच्या शहरांची सुरक्षा लक्षणीयरीत्या वाढवण्यात आली असून, रेल्वे स्थानके, बस स्थानके आणि धार्मिक स्थळे पोलिस छावणीचे स्वरूप धारण करत आहेत.

दिल्लीत एका उभ्या असलेल्या कारमध्ये झालेल्या भीषण स्फोटाने संपूर्ण देशात मोठी खळबळ उडाली आहे. या स्फोटात आतापर्यंत ९ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी आहेत. मृतांचा आकडा



वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. या जीवघेण्या स्फोटानंतर केंद्रीय गुप्तचर यंत्रणांनी तातडीने अलर्ट जारी केला असून, महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, शिर्डीसह प्रमुख शहरांमध्ये हाय अलर्ट आणि विशेष खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**प्रमुख शहरांमध्ये नाकाबंदी, वाढवली गस्त**

मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, कल्याण, पिंपरी-चिंचवड आणि छत्रपती संभाजीनगरसह राज्यातील सर्व प्रमुख शहरांत पोलिसांनी नाकाबंदी सुरू केली आहे. रात्री उशिरापर्यंत वाहन तपासणी, लॉज तपासणी आणि संशयितांची चौकशी सुरू होती.

पुण्यात पोलिसांकडून रेल्वे स्टेशन, बसस्थानक आणि गर्दीच्या ठिकाणांवर बीडीडीएस पथक, डॉग स्क्वॉड आणि बॉम्ब शोधक पथकांची तपासणी मोहीम राबवली जात आहे. लोहमार्ग पोलिस आणि रेल्वे सुरक्षा बल संयुक्तपणे प्रवाशांच्या बॅगा आणि पार्सल तपासत आहेत.

पिंपरी-चिंचवड पोलिसांनाही हाय अलर्ट जारी करण्यात आला असून शहरातील प्रवेशद्वारांवर तपासणी पोस्ट उभारण्यात आल्या आहेत. प्रत्येक वाहनाची तपासणी करून संशयास्पद व्यक्तींवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

**राज्यातील प्रमुख मंदिरांमध्ये वाढवली सुरक्षा**

दिल्लीतील घटनेनंतर राज्यातील प्रमुख धार्मिक स्थळांनाही विशेष सुरक्षा कवच देण्यात आले आहे. शिर्डीच्या साईबाबा मंदिरात पोलिसांकडून सर्व प्रवेशद्वारांवर नाकाबंदी सुरू असून राज्यभरातून येणाऱ्या वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. साईदरबारी देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी अहमदनगर जिल्हा पोलिस अलर्ट मोडवर आहेत.

शेगावच्या संत गजानन महाराज मंदिरात मेटल डिटेक्टरद्वारे भाविकांची तपासणी करूनच प्रवेश दिला जात आहे. मंदिर परिसरात शीघ्रकृतिदल, सशस्त्र पोलिस आणि स्थानिक पोलिस फौज तैनात आहेत.

मुंबईतील सिद्धीविनायक मंदिरातही भाविकांची गर्दी लक्षात घेऊन सुरक्षा अधिक कडक करण्यात आली आहे. मंदिराचे कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी यांनी पोलिसांसोबत बैठक घेऊन सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला.संपूर्ण महाराष्ट्रात पोलिस यंत्रणा अलर्ट मोडवर असून संवेदनशील भागांमध्ये अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कुठलीही अप्रिय घटना टाळण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने गस्त, चौकशी आणि तपासणी सुरू आहे. अफवांवर विश्वास ठेवू नका, संशयास्पद हालचाली दिसल्यास तात्काळ जवळच्या पोलिस ठाण्यात कळवा आणि प्रशासनाला सहकार्य करा, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

## बिहारमध्ये दुसऱ्या टप्प्यात उत्स्फूर्त मतदान

### दुपारी ३ वाजेपर्यंत ६० टक्के मतदानाची नोंद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११पटना**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात जोरदार मतदान होत आहे. दुपारी ३ वाजेपर्यंत १२२ जागांसाठी तब्बल ६० टक्के मतदान झाल्याची नोंद आहे. किशनगंज जिल्ह्यातील मतदारांमध्ये विशेष उत्साह दिसून आला असून येथे ५१ टक्क्यांहून अधिक मतदान झाले आहे. तर मधुबनी जिल्ह्यात मतदानाचा वेग तुलनेने मंद असून येथे अद्याप फक्त ४३ टक्के मतदान झाले आहे.

सकाळच्या पहिल्या चार तासांत ३१.३८ टक्के मतदान झाले होते. जर हीच गती कायम राहिली, तर विक्रमी मतदानाची शक्यता वर्तवली जात आहे. सकाळी ९ वाजेपर्यंत १२२ मतदारसंघांमध्ये १४.५५ टक्के मतदान झाले होते.या दुसऱ्या आणि अंतिम टप्प्यात एकूण ३.७० कोटी मतदार १,३०२



उमेदवारांचे भविष्य ठरवत आहेत. नवादा विधानसभा क्षेत्रातील एका मतदान केंद्रावर ईव्हीएममध्ये बिघाडाची तक्रार प्राप्त झाली आहे. संपूर्ण राज्यात शांततेत व निष्पक्ष मतदान पार पडावे यासाठी सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली असून चार लाखांहून अधिक सुरक्षाकर्मी तैनात करण्यात आले आहेत.

राज्यात दुसऱ्या टप्प्यातील १२२ मतदारसंघांसाठी एकूण ४५,३९९ मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत, त्यापैकी ४०,०७३ ग्रामीण भागात आहेत. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, सुमारे ८,४९१ मतदान केंद्रांना संवेदनशील म्हणून चिन्हांकित करण्यात आले आहे.

या टप्प्यात मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या मंत्रिमंडळातील अर्धा डझनहून अधिक मंत्री मैदानात आहेत. पश्चिम चंपारण, पूर्वी चंपारण, सीतामढी, मधुबनी, सुपौल, अररिया आणि किशनगंज या नेपाळ सीमेलगतच्या जिल्ह्यांमध्ये आज मतदान होत आहे.

## काँग्रेसचा मनसेसोबत आघाडी करण्यास ठाम नकार; काँग्रेस कोणत्याही स्थितीत मनसेसोबत जाणार नाही, बाळासाहेब थोरात यांची स्पष्टोक्ती



**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई**

आगामी मुंबई महापालिका तसेच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. अशातच काँग्रेसकडून मोठा राजकीय संदेश देण्यात आला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मुंबई महापालिका स्वबळावर लढण्याची घोषणा केल्यानंतर, आता काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनीही स्पष्ट भूमिका मांडली आहे. काँग्रेस कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसोबत जाणार नाही, असे थोरात यांनी ठामपणे सांगितले. त्यामुळे मनसेसोबत संभाव्य आघाडीच्या चर्चेला पूर्णविराम लागल्याचं स्पष्ट दिसत आहे.

बाळासाहेब थोरात यांनी स्पष्ट सांगितलं की, काँग्रेसचा निर्णय ठाम आहे, मनसेबरोबर कोणतीही आघाडी होणार नाही. त्यांच्या या वक्तव्याने काँग्रेसची निवडणूक रणनीती अधिक स्पष्ट झाली आहे. गेल्या काही दिवसांत मनसे आणि काँग्रेसच्या संभाव्य सहकार्याबाबत अफवा पसरल्या होत्या. मात्र, थोरात यांच्या भूमिकेमुळे या सर्व चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. काँग्रेस मुंबई महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार असल्याचं संकेत आता अधिक ठळकपणे मिळत आहेत.

**मनसेची पुढील भूमिका काय असणार याकडे सर्वांचं लक्ष**

राज्यातील राजकीय वातावरण सध्या अत्यंत चुरशीचं बनलं आहे. काँग्रेसकडून मनसेसोबतच्या आघाडीला नकार दिल्यानंतर, मनसेची पुढील भूमिका काय असणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. दुसरीकडे, काँग्रेस स्थानिक निवडणुकांसाठी स्वतंत्र तयारी करत असून, कार्यकर्त्यांना एकसंघ ठेवण्यावर वरिष्ठ नेते भर देत आहेत. बाळासाहेब थोरात यांचे हे वक्तव्य काँग्रेसच्या स्वबळावर लढण्याच्या धोरणाला बळकटी देणार आहे. त्यामुळे आगामी निवडणुका अधिक रंगतदार आणि रोचक होणार यात शंका नाही.

## शिवसेना पक्ष, चिन्हावर उद्या निर्णायक सुनावणी

### सुप्रीम कोर्टात होणार अंतिम युक्तिवाद; १२ नोव्हेंबरच्या कामकाजात खटला १९ व्या स्थानी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई**

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण या प्रतीकावरून सुरू असलेला राजकीय आणि कायदेशीर वाद आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. सर्वोच्च न्यायालय बुधवारी या प्रकरणावर अंतिम सुनावणी घेणार असून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या ऐतिहासिक खटल्याकडे लागले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला शिवसेना नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह वापरण्याची परवानगी केंद्रीय निवडणूक आयोगाने दिली होती. मात्र, या निर्णयाला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. आता सर्वोच्च न्यायालय या याचिकेवर अंतिम निर्णय देणार असल्याने राज्याच्या राजकारणात मोठे बदल घडू शकतात.

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठासमोर बुधवारी या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. न्यायालयात उद्धव ठाकरे गटाने दाखल केलेली मूळ याचिका आणि त्यासोबत सादर केलेले अंतरिम अर्ज यावर सुनावणी होईल. १२ नोव्हेंबरच्या कामकाज यादीप्रमाणे, या खटल्याला आयटम नंबर १९ वर





स्थान देण्यात आले आहे. पक्षचिन्ह आणि अपात्रता या दोन्ही मुद्द्यांवरील याचिका एकत्र ऐकली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे या सुनावणीदरम्यान अनेक संवैधानिक आणि राजकीय प्रश्नांवर चर्चा होणार असल्याचे दिसून येत आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने २०२२ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार, शिवसेनेच्या नावाचा आणि धनुष्यबाण चिन्हाचा वापर करण्याचा अधिकार एकनाथ शिंदे गटाला देण्यात आला होता. या निर्णयाने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भुकंप निर्माण केला. उद्धव ठाकरे गटाने हा निर्णय असंवैधानिक आणि पक्षपाती असल्याचा आरोप करत सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले. याचिकेत म्हटले आहे की, मूळ शिवसेना पक्षाची स्थापना आणि कार्यसंघटना उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली चालू होती. त्यामुळे पक्षाच्या चिन्हावर आणि नावावर हक्क हा त्यांच्या गटाचा आहे, असे उद्धव ठाकरे यांच्या वकिलांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे गटातील नेत्यांनी आशावादी सूर लावला आहे. आम्ही न्यायालयावर पूर्ण विश्वास ठेवतो. सत्य आणि न्याय आमच्याच बाजूने आहे, असे विधान उद्धव ठाकरे गटातील प्रमुख नेत्यांनी केले आहे. तर, शिंदे गटानेही आपली तयारी पूर्ण केल्याचे सांगितले आहे. आमच्याकडे बहुमताचा पुरावा आहे, त्यामुळे निकाल आमच्या बाजूने लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय कोणाच्या बाजूने लागतो, यावर महाराष्ट्रातील पुढील राजकीय समीकरणे ठरणार आहेत. उद्याच्या सुनावणीनंतर धनुष्यबाण कोणाच्या हाती राहणार, हेच आता सर्वांच्या उत्सुकतेचे केंद्र ठरले आहे.

## भाजपच्या निवडणूक प्रमुखपदी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११मुंबई**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने मोठा निर्णय घेत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची निवडणूक प्रमुखपदी निवड केली असल्याची माहिती समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री यांचे निवासस्थान वर्षा येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असल्याची देखील सध्या माहिती समोर येत आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीप्रमाणे भाजपला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत यश मिळून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार तयारी केली असून मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक प्रमुखपदी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती समोर येत आहे.विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा एकदा भाजपने बावनकुळे यांच्यावर मोठी जबाबदारी टाकली आहे. बावनकुळे प्रदेशाध्यक्ष असताना भाजपने विधानसभा २०२४ च्या निवडणुकीत ऐतिहासिक कामगिरी करत १२० पेक्षा जास्त जागांवर बाजी मारली होती.

## संपादकीय ......

# तोच रस्ता, तेच प्रश्न, फक्त निवडणुका नव्या

महापालिका निवडणुकींच्या प्रभाग रचना जाहीर झाल्यावर रस्ते, आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक वाहतूक, पाणीपुरवठा, स्वच्छता, बेकायदा बांधकामे या विषयांच्या पलीकडे पालिकांच्या निवडणुका मागील पाच ते सात दशकांपासून गेलेल्या नाहीत. ठाणे, भिवंडी, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर या महापालिकांचा प्रवास नगरपालिका ते महापालिकेपर्यंत जरी झालेला असला तरी नागरिकांचे मूलभूत प्रश्न आजही तेच तसेच कायम आहेत. लोकशाहीतील नागरिकांचा थेट आणि थोडासा औपचारिक तातडीचा संबंध असलेला नगरपालिकांचा विषय म्हणूनच नागरिकांसाठी जिव्हाळ्याचा असतो.

लोकसभा विधानसभेच्या निवडणुकीतील राजकारण आणि सत्तेची गणितं म्हणूनच नगपालिकेच्या निवडणुकीत तेव्हढी कामी येत नाहीत. काही हजारांच्या संख्येनेही प्रभाग रचना असल्याने उमेदवारांचे व्यक्तीगत संबंध महत्वाचे असल्याने पक्षीय राजकारण त्यानंतरचे असते. ठाणे जिल्ह्यातील बहुतांश महापालिका आणि नगरपालिकांच्या प्रभाग रचना जाहीर झाल्या असल्याने आता नागरिकांच्या मूलभूत सुविधांची चर्चा आणि त्याचे राजकारणही सुरू झाले आहे. नागरी सेवांच्या इतर विभागांच्या तुलनेत रस्ते विकासाच्या प्रश्नावर तुलनेने आर्थिक गैरव्यवहाराचे जास्त आरोप होत असतात.

ठाण्यातील नागरी क्षेत्रातही हा प्रश्न कित्येक दशकांपासून कायम आहे. अगदी पंचायत समितींच्या रस्ते कामांपासून ते शहरातील रस्त्यांमध्येही निविदांपासून ते टक्केवारी, कामाचा दर्जा, विलंब याविषयी आवाज उठवले जातात, रस्त्यांसाठी आंदोलने, उपोषणे केली जातात. खड्डे भरण्याच्या, डांबरीकरणापासून ते कॉंक्रिटीकरणाच्या कामापर्यंत रस्ते विकासासाठी मंजूर झालेला शेकडोंचा निधी हजारोंच्या घरात गेल्यानंतरही कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह कायम राहते. पालिका निवडणुकांना काही महिन्यांचा अवकाश असताना रस्त्यांच्या कामांना उत आला आहे. ठाणे क्षेत्रात रस्त्यांच्या नव्या कामे, लोकापर्णांना सुरुवात आताशा झाली आहे. हे सगळे पालिका निवडणुकांना डोळ्यांसमोर ठेवून केले जात आहे.

भिवंडी तालुक्यातील चिंचोटीकडे जाणार्या रस्त्यांच्या कामावर भ्रष्टाचाराचा आरोप झाला. यातील अधिकार्यांच्या खातेनिहाय चौकशीची मागणी झाली. भिवंडी-चिंचोटी रस्त्याची मागील अनेक वर्षांपासून दयनीय अवस्था होती. चार वर्षात किंवा त्याआधीही या कामाकडे कुणाचेही लक्ष नव्हते, आता अचानक या रस्ते दुरवस्थेची आठवण पालिकेच्या अधिकार्यांना झाली आहे. या रस्त्याच्या कामांची जवळपास ४० कोटी रुपयांची बोगस बिले काढल्याचा आरोप अधिकार्यांवर स्थानिक राजकीय नेत्यांनी केला आहे. ठाणे जिल्हाधिकार्यांकडे चौकशीची लेखी तक्रार करण्यात आली आहे. हे महापालिका असलेल्या शहरातील प्रातिनिधीक उदाहरण म्हणाले, शहापूरसारख्या ग्रामीण भागतही वेगळी परिस्थिती नाही.

पालिकांच्या तुलनेत ग्रामीण भागांना मिळणारा निधी आणि महसूल कमी असल्याने या ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचार्यांच्या पगारावर होणारा खर्च परवडणारा नाही. त्यामुळे नव्या भरतींना सरकाकडून मंजुरीच मिळत नाही. शहापूर तालुक्यातील जिल्हा महामार्ग तसेच गावपाड्यांना जोडणार्या रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. शासनाने मैल कामगार भरती कायमची बंद केल्याने या रस्त्यांच्या निगराणीचा प्रश्न गंभीर बनला आहे. तालुक्यातील सुमारे ५२७ ग्रामीण रस्ते आणि १४ जिल्हा महामार्गाच्या कडेला मोठ्या प्रमाणात झाडे-झुडपे वाढल्याने अपघातांचा धोका आहे. पूर्वी जिल्हा परिषद बांधकाम विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागातील मैल कामगार पावसाळ्यानंतर रस्त्यांच्या साईड पट्ट्यांवरील झाडे झुडपे साफ करून रस्ता सुस्थितीत ठेवत असत. मात्र, आता भरती बंद झाल्याने आणि सेवेतील कामगार सेवानिवृत्त झाल्याने हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच कामगारांकडून कामे केली जात आहेत. कल्याणात विकासकामांच्या भूमिपुजनाचा राजकीय धडाका सुरू झाला आहे.

पालिकेवरील प्रशासकीय राजवटीमुळे लोकप्रतिनिधींना लोकांनी विचारलेल्या प्रश्नातून पळवाटेची सोय होती. मात्र आता निवडणुकीचे वेध लागल्यावर हीच पळवाट गैरसोयीची झाली आहे. केलेल्या कोणत्या कामांच्या बळावर आपण मते मागावी, असा प्रश्न केडीएमसीतील लोकप्रनिधींना पडला आहे. त्यामुळे घाईघाईत कामांचे शुभारंभ करून कित्येक जुन्याच कामांचे श्रेय घेण्यासाठी राजकारण्यांची चढाओढ लागली आहे. बदलापूर, अंबरनाथमध्ये रस्ते रुंदीकरणाचा प्रश्न कित्येक वर्षे जुनाच आहे. बदलापूरमध्ये ६ मीटरचे रस्ते ९ मीटर करण्याची योजना १७ वर्षे जुनी असल्याने पालिका निवडणुकांमुळे हा विषय पुन्हा समोर आणला गेला आहे. निवडणुका संपल्यावर पुन्हा हा विषय बासनात गुंडाळून ठेवल्याचा अनुभवही बदलापूरकरांना नवा नाही. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना ठाणे शहर राजकारणाचा केंद्रबिंदू होते.

शिवसेनेच्या शिंदे गटाची सगळी राजकीय मदार याच शहराच्या राजकारणावर असल्याने एकनाथ शिंदे यांनी येथील पालिका, नगरपालिकांवरही आपली पकड सैल न होण्याची काळजी घेतली. परंतु भाजपाकडूनही ठाणे शहरातील पालिकांवर एकहाती वर्चस्व मिळवण्याचे प्रयत्न सुरू झाल्याने या भागातील उल्हासनगर, कल्याण डोंबिवली, बदलापूर, अंबरनाथ आदी भागात स्वबळाची भाषा सुरू झाली आहे. ठाणे महापालिकेतील न सुटलेले प्रश्न समोर आणून भाजपकडून शिंदेंच्या बालेकिल्ल्याला हादरे देण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. यात पाणीपुरवठा, अतिक्रमणे, रस्ते, आरोग्य, धोकादायक इमारतींचा प्रश्न समोर आणले जात आहेत. पालिकेच्या राजकारणातील मुद्देही तेच आहेत, होणारा विलंबही तसाच आहे, आरोपही तेच आहेत. निवडणुका या बदलाची नांदी असतात, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या निमित्ताने असा बदल यंदाही अनुभवायला मिळायला हवा, मतदाराला ही आशा आहे.

# तुमच्या शेतात, मोकळ्या जागेत फळबाग लागवड करा, १०० टक्के अनुदान मिळतंय!




**दि.११विदर्भ प्रजासत्ताक-** केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत रोह्यो योजनेंतर्गत १०० टक्के अनुदानावर फळ रोपांची सलग व बांधावर लागवड केली आहे. जर तुम्हालाही मनरेगा अंतर्गत तुमच्या शेतात फळबाग लागवड करायची असल्यास ही योजना फायदेशीर आहे.

असे आहेत पात्रतेचे निकष

लाभार्थ्यांच्या नावे जमीन असावी. जॉबकार्डधारक व अल्प/अत्यल्प भूधारक शेतकरी असावा. जमीन कूळ कायद्याखाली येत असल्यास व सातबारा उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल, तर योजना कुळाच्या संमतीने राबविता येते. लाभार्थ्यांना ०.०५ ते २.०० हेक्टर क्षेत्राचे मर्यादित फळबाग लागवड करता येते.

**तीन वर्षांत असे मिळत असते अनुदान-** केंद्र शासन पुरस्कृत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत १०० टक्के अनुदान दिले जाते. हे अनुदान तीन वर्षांत टप्प्याटप्प्याने दिले जाते. प्रथम वर्षात रोप खरेदी, वाहतूक, लागवड, मजूरी, खत व पाण्याचे नियोजन करण्यासाठी ५० टक्के अनुदान, द्वितीय वर्षात झाडे २० टक्के जीवंत राहिल्यास ३० टक्के, तर तृतीय वर्षी २० टक्के अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर दिले जाते, अशी माहिती कृषी अधिकारी अरुण रामटेके यांनी दिली.

भंडारा जिल्ह्यात ३०७ हेक्टरवर लागवड

एकट्या भंडारा जिल्ह्यात २४९ शेतकऱ्यांनी ३०७ हेक्टरवर आंबा, पेरू, केळी, सीताफळ व फणस आदी स्थानिक बाजारपेठेत मागणी असलेल्या यात २४ हजार ६७७ फळ रोपांचा समावेश आहे. मार्च ते जून या कालावधीत सलग शेतात ९ हेक्टर, तर २९८ हेक्टर बांधावर विविध फळ रोपांची लागवड झाली आहे. फळबागेतील रोपे लहान असताना ३ ते ५ वर्षांपर्यंत सलग शेतातील मोकळ्या जागेत भाजीपालावर्गीय पिकांचे उत्पादन शेतकऱ्यांना घेता येणार आहे.

यंदा फळबाग लागवड योजनेला शेतकऱ्यांचा दमदार प्रतिसाद लाभला. शेती पूरक व्यवसायात वाढ करणे, उत्पादन वाढविणे हा या योजनेचा उद्देश आहे. फळबागसाठी १०० टक्के अनुदान दिले जाते. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभघ्यावा.

**- संगीता माने, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, भंडारा.**




# चुकूनही फ्रिजमध्ये ठेवू नका 'या' गोष्टी; बिघडेल अन्नाची चव

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक**

अनेकदा लोकांचा असा समज असतो की फ्रिजमध्ये एखादी गोष्ट ठेवली की ती जास्त काळ फ्रेश राहते आणि टिकते. मात्र काही गोष्टी फ्रिजमध्ये ठेवल्यास त्याची चव बदलते. जर तुम्ही त्या गोष्टी स्वयंपाकात वापरल्या तर अन्नाची चव बिघडते. त्यामुळं शक्यतो त्या गोष्टी फ्रिजमध्ये ठेवण्याची चूक करू नये.



**मध-** मध फ्रिजमध्ये ठेवल्याने जास्त घट्ट होते. मुळातच मध हे लवकर खराब होत नाही. त्यामुळे मध फ्रिजमध्ये ठेवण्याची आवश्यकता नसते. तुम्ही मध घरातील कोरड्या जागेत, हवाबंद डब्ब्यात ठेवल्यास ते नीट टिकते.

**ब्रेड-** अनेकांच्या घरी ब्रेड हा फ्रिजमध्ये ठेवला जातो. फ्रिजमध्ये ठेवल्याने ब्रेड जास्त फ्रेश राहतो असं वाटतं. पण ते चुकीचं आहे. कारण फ्रिजमध्ये ब्रेड ठेवल्यास तो लवकर वाळतो आणि शिळा होतो. त्यामुळे शक्यतो सामान्य तपमानात एका सुती कापडात किंवा ब्रेड बॉक्समध्ये तो ठेवावा.

**कांदे-** कांदे हे कधीच फ्रिजमध्ये ठेवू नयेत. कारण फ्रिजमधील आर्द्रतेमुळे ते लवकर खराब होऊन त्यावर बुरशी निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे कांदे नेहमी खुल्या जागी ठेवावे. तसेच बटाटे आणि कांदे हे एकत्र ठेवू नयेत.

**बटाटे-** थंड हवेमुळे बटाट्याचा स्टार्चचे लवकर साखरेत रूपांतर होतं.. यामुळे त्याची चव बदलते आणि तो गोडसर लागतो. त्यामुळे बटाटे कधीही फ्रिजमध्ये ठेवू नये.

**लसूण-** फ्रिजमधील तापमानामुळे लसणाची चव बिघडते. त्यामुळे लसूण नेहमी कोरड्या, हवेशीर ठिकाणी एखाद्या टोपलीत ठेवावा.

**टोमॅटो** बहुतांश वेळा टोमॅटो हे दीर्घ काळ फ्रेश राहण्यासाठी फ्रिजमध्ये ठेवले जातात. मात्र यामुळे टोमॅटोची चव बिघडते. त्यामुळे टोमॅटो हे सामान्य तापमानात हवेशीर ठिकाणी साठवा.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाचे कामकाज सुरळीत सुरु

## अफवांना बळी न पडण्याचे आवाहन




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ अमरावती-** मराठा समाजातील बेरोजगार युवकांसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांविषयी अलीकडील काही दिवसांपासून सोशल मीडियासह विविध माध्यमांतून नकारात्मक व निराधार अफवा पसरविल्या जात आहेत. या अफवांना कोणतेही तथ्य नसून, महामंडळाचे नवीन पात्रता प्रमाणपत्र देण्याचे काम वगळता इतर सर्व कामकाज सुरळीतपणे सुरु आहे.महामंडळामार्फत जुलै ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत मोठ्या संख्येने कर्ज मंजुरी देण्यात आली आहे. दि. १० ऑक्टोबर २०२५ पासून महामंडळाच्या वेब प्रणालीचे अद्ययावतीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे, वेब प्रणालीचे सुरक्षा लेखापरीक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत, कर्ज व बँक मंजुरी या दोन सेवा १५ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसात देण्यासाठी आवश्यक ते बदल करणे सुरु आहे. मध्यस्थांमार्फत लाभार्थ्यांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी, महामंडळाने सीएसआर केंद्राद्वारे फक्त १० रुपयांत सेवा उपलब्ध व्हावी यासाठी सामंजस्य करार केला आहे, त्यास अनुषंगाने वेब प्रणालीमध्ये बदल करण्याचे काम सुरु आहे. लाभार्थ्यांना महामंडळाच्या सर्व सेवा थेट मोबाईलद्वारे देता याव्यात म्हणून मोबाईल प विकसित होत आहे.महामंडळामार्फत लाभार्थ्यांना सुरळीत व सहजपणे व्याज परतावा मिळणार आहे. लाभार्थ्यांना योजनांबाबत मार्गदर्शन व माहिती देण्यासाठी चॅटजीपीटी प्रणाली विकसित करण्यात आली आहे. महामंडळ समाजाच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी कटिबद्ध आहे, तरी सर्वसामान्य नागरिकांना आणि लाभार्थ्यांना विनंती आहे की, कोणत्याही प्रकारच्या दिशाभूल करणाऱ्या किंवा अफवांवर आधारित माहितीवर विश्वास ठेवू नये. महामंडळाचे सर्व कामकाज सुरु असून, वेब प्रणालीचे अद्ययावतीकरण हे समाजहिताचे व लाभार्थ्यांच्या सोयीसाठीचे आहे, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा समन्वयक रोहित मोंढे यांनी केले आहे.

# अमरावती शहरात वाहतूक नियमांमध्ये बदल

## पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ अमरावती** अमरावती शहरात नोव्हेंबर महिन्यात दर रविवारी सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत वाहतूक नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. यासाठी पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी अधिसूचना जारी केली आहे. सर्व वाहनांना वाहतूकीसाठी बंद करण्यात येणारे मार्गनोव्हेंबर महिन्यातील १६ नोव्हेंबर, २३ नोव्हेंबर व ३० नोव्हेंबर रोजी सकाळी ६ ते ८ वाजता वेलकम टी पॉईट कडून बियाणी चौकाकडे येणार एकतर्फी मार्ग सर्व वाहनांना वाहतूकीसाठी बंद करण्यात आला आहे.वाहतूकीस पर्यायी मार्ग वेलकम टी पॉईट ते पंचवटी चौकपासून कांता नगर चौक किंवा प्रादेशिक परिवहन कार्यालय मार्ग वरील वाहतूक नियमन रूग्णवाहिका, अग्नीशामक वाहन, कायाद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अत्यावश्यक सेवेच्या वाहनांना लागू राहणार नाही. वाहतूक परिस्थितीनुसार वाहतूक थांबविणे व वळविणे याबाबत सर्व अधिकार वाहतूक विभागास राहील. तसेच अत्यावश्यक वेळी जनहित लक्षात घेता सहायक पोलीस आयुक्त वाहतुक अमरावती शहर यांना कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातुन नियोजित अधिसूचनेमध्ये वाहतूकीच्या नियमनाबाबत अंशत: बदल करण्याचे अधिकार राहील. ही अधिसूचना माहे नोव्हेंबर २०२५ मधील दर रविवारी सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत प्रायोगिक तत्वावर अंमलात राहील.या अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालक, वाहनधारकांवर मोटर वाहन अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी या कालावधीत सहकार्य करावे आणि वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




# हमीभावाने मूग, उडीद, सोयाबीन खरेदी, १५ नोव्हेंबरपासून सुरु होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ अमरावती-** महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ आणि नाफेड यांच्या संयुक्त विद्यमानाने हंगाम २०२५-२६ मध्ये केंद्र सरकारने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार मूग, उडीद आणि सोयाबीनची प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया १५ नोव्हेंबरपासून सुरु होणार आहे. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत असून, खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी सुरु करण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाने या पिकांसाठी आधारभूत दर निश्चित केले आहेत. त्यानुसार, मूग ८ हजार ७६८ रुपये, उडीद ७ हजार ८०० रुपये आणि सोयाबीन ५ हजार ३२८ रुपये प्रति क्विंटल दर निश्चित केले आहेत.खरेदी प्रक्रियेसाठी राज्य शासनाने दोन केंद्रीय नोडल एजन्सींची नियुक्ती केली आहे. यामध्ये नाफेडकडे (छषशव)




अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिमसह एकूण २२ जिल्ह्यांची जबाबदारी असेल, तर एनसीसीएफकडे (छउउऋ) नागपूर, चंद्रपूर, नाशिक, अहिल्यानगर, सोलापूर, हिंगोली या एकूण ६ जिल्ह्यांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपल्या गावाजवळील नाफेड,किंवा एनसीसीएफच्या खरेदी केंद्रावर जाऊन नोंदणी करणे अनिवार्य आहे. ही नोंदणी ऑनलाईन पद्धतीने पॉस मशीनद्वारे करण्यात येणार आहे. नोंदणीसाठी आधारकार्ड, बँकेचे पासबुक, चालू वर्षाचा ७/१२ उतारा आणि पीकपेरा या कागदपत्रांसह शेतकऱ्यांची केंद्रावर प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक आहे. नोंदणीनंतर एसएमएस प्राप्त झाल्यावरच शेतकऱ्यांनी आपला शेतमाल विक्रीसाठी केंद्रावर घेऊन यावा, असे आवाहन पणन महासंघाच्या संचालक मंडळाने केले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# दिल्ली विकासाचे मॉडेल महाराष्ट्रात आणणार

## आम आदमी पार्टीच्या माजी मंत्री राखी बिर्ला यांचे प्रतिपादन

### हजारो महिलांची उपस्थिती



**विदर्भ प्रजासत्ताक दि.११चांदूर रेल्वे**

दिल्लीमध्ये आम आदमी पक्षाने शिक्षण, आरोग्य, पाणी आणि वीज या मूलभूत सेवांमध्ये क्रांती केली, तसेच हाच विकासाचा मॉडेल महाराष्ट्रातही आणायचा आहे. चांदूर रेल्वेचा नागरिक सजग आहे, पण त्याला हक्काची सुविधा मिळत नाही. आता चांदूर रेल्वे शहरात 'धनशक्ती' नव्हे तर 'जनशक्ती'चा विजय व्हायला हवा असे प्रतिपादन दिल्ली विधानसभेच्या माजी उपसभापती व माजी कॅबिनेट मंत्री राखी बिर्ला यांनी केले. त्या चांदूर रेल्वे संताबाई यादव मंगल कार्यालयात सोमवारी (ता. १०) आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित भव्य कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होत्या. यावेळी पुरूषांसह हजारो महिलांची उपस्थिती होती.

त्यांनी पुढे म्हटलं की, मला माहिती मिळाली की, चांदूर रेल्वे शहरात उर्दू माध्यमाची शाळा केवळ १०वीपर्यंतच आहे. ११वी-१२वीच्या कॉलेजचा अभाव ही मोठी समस्या आहे. आपल्या भाषेत शिक्षण घेणं हा प्रत्येक विद्यार्थ्याचा अधिकार आहे. त्यामुळे उर्दू माध्यमाचे कॉलेज स्थापन प्राधान्याने करू. शहरात महिलांच्या सुरक्षेसाठी सर्वत्र सि.सि.टी.व्ही कॅमेरे बसवणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सरकारी दवाखान्यातील औषधांच्या टंचाईवर टीका करत त्यांनी गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा व पूर्णवेळ डॉक्टरांची नेमणूक करण्याची गरज असल्याचे सांगितले. प्रत्येक घरात स्वच्छ आणि सुरक्षित पेयजल पुरवठा हा नगरपरिषदेचा मूलभूत दायित्वाचा भाग आहे, असे त्या म्हणाल्या. तसेच शहरात क्रीडांगणे, गार्डन गरजेचे आहे. याशिवाय सफाई कर्मचाऱ्यांना सेफ्टी किट, आरोग्य तपासणी आणि विमा सुविधा देऊन त्यांच्या जीवनमानात सुधारणा करणे आवश्यक असल्याचेही राखी बिर्ला यांनी अधोरेखित केले. व स्थानिक नगर परिषदेत आम आदमी पार्टीच्या उमेदवाराला निवडून देण्यास सदर कामे प्राधान्य करू असे त्यांनी म्हटले त्यांच्या भाषणाने सभागृहात एक वेगळाच जोश महिलांमध्ये निर्माण झाला होता. या भव्य कार्यकर्ता मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आपचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रा. वसंतराव ढोके होते. प्रमुख वक्त्या म्हणून दिल्ली विधानसभेच्या माजी उपसभापती व माजी कॅबिनेट मंत्री राखी बिर्ला प्रमुख उपस्थित होत्या. तर प्रमुख पाहुण्यांमध्ये विदर्भ कार्यकारिणी सदस्य अजित इंगोले, विलास वाडे, जिल्हाध्यक्ष सुभाष गोहत्रे, कॉ. रामदास कारमोरे (माकप), नितीन गवळी, मेहमुद हुसैन, डॉ. क्रांतीसागर ढोले, प्रभाकर भगत (जनता दल), प्रशांत शिरभाते (स्वाभिमानी शेतकरी संघटना), सौरभ इंगळे (प्रहार), नम्रता गवळी, मंगेश डाफ, सागर गावंडे, कमलकिशोर पनपालीया आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. राखी बिर्ला यांच्या भेटीने चांदूर रेल्वेतील आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा मिळाली आहे. शहराच्या स्थानिक प्रश्नांना जनशक्तीच्या बळावर सोडवण्यासाठी 'आप' सज्ज असल्याचा निर्धार या मेळाव्यातून दिसून आला. या मेळाव्या दरम्यान मुलायमचंद जैन, डिंपल जोल्हे, अशोक राजूरकर व मुक्ता राजूरकर, सीए आचल खोलापुरे चे पालक यांच्यासह आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संजय डगवार यांनी केले.




# चांदूर रेल्वे आम आदमी पार्टीचा कार्यकर्ता मेळावा उत्साहात

### नम्रता गवळी ठरल्या नगराध्यक्ष पदाच्या पहिल्या उमेदवार

या कार्यकर्ता मेळाव्यात आम आदमी पार्टीचे शहराध्यक्ष मंगेश डाफ यांनी थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीकरिता पक्षातर्फे नम्रता नितीन गवळी यांचे नाव सुचविले. या नावाला तालुकाध्यक्ष सागर गावंडे यांनी अनुमोदन दिले. सभागृहात उपस्थित हजारो नागरिकांनी सुध्दा त्यांच्या नावाला हात वर करून संमती दिली हे विशेष. यानंतर आपचे जिल्हाध्यक्ष सुभाष गोहत्रे व प्रदेश उपाध्यक्ष वसंतराव ढोके यांनी त्यांच्या नावाची घोषणा सभागृहात केली. त्यामुळे नम्रता गवळी ह्या स्थानिक नगराध्यक्ष पदाच्या पहिल्या उमेदवार ठरल्या असून इतर पक्षांचे उमेदवार उमेदवारांची घोषणा होणे बाकी आहे.-

## २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ

# स्पोर्ट मीट क्रीडा महोत्सवाकरिता विद्यापीठाचे संघ घोषित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे ०४ ते ०८ डिसेंबर, २०२५ दरम्यान होणा-या २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ स्पोर्ट मीट क्रीडा महोत्सवाकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे ॲथलेटिक्स (पुरुष व महिला), बास्केटबॉल (पुरुष व महिला), कबड्डी (पुरुष व महिला), व्हॉलिबॉल (पुरुष व महिला), बुध्दीबळ (पुरुष व महिला), टेबल टेनिस (पुरुष व महिला), बॅडमिंटन (पुरुष व महिला) संघ घोषित करण्यात आले आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग दि. २२ नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

# जिल्ह्यातील वाळूघाट लिलावास मोठा प्रतिसाद

## १ कोटीच्या बदल्यात सर्वोच्च ७ कोटी किंमत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती-** महसूल व वनविभागाने वाळू निर्गती धोरण जाहिर केले आहे. वाळू लिलाव धोरणातील तरतुदीनुसार सन २०२५-२६ या वर्षाकरीता जिल्ह्यातील ३३ वाळूघाटांकरीता ई-निविदा व ई-लिलावाच्या प्रथम फेरीची प्रक्रिया राबविण्यात आली. त्यापैकी लिलावामध्ये ३३ पैकी तांत्रिकदृष्ट्या पात्र ८ वाळू घाटांचा लिलाव करण्यात आला. या लिलावामध्ये ८ वाळू घाटांची हातची किंमत ही केवळ १ कोटी असतानाही लिलावामध्ये एकुण ७ कोटी सर्वोच्च किंमत प्राप्त झाली आहे.जिल्ह्यातील अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांची काटेकारेपणे अंमलबजावणी करुन कार्यवाही करण्याचे सक्त निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले आहे. तसेच जिल्ह्यात महसूल यंत्रणेमार्फत अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीच्या २६४ कारवाया करुन दंडाची कारवाई केली आहे. सदर लिलावाची घाटनिहाय प्रक्रिया राबविल्यामुळे व परराज्यातुन येणारी वाळुची वाहतुक बंद केल्यामुळे सदर वाळू लिलावास सकारात्मक प्रतिसाद मिळालेला असून शासकीय वसुली



वाढण्यास मोलाची भर पडली आहे.एकुण ३३ वाळू घाटांपैकी लिलाव झालेले ८ वाळूगट वगळता उर्वरित २५ वाळूघाटांची लिलावाची दुसरी फेरीची प्रक्रिया ऑनलाईनरित्या ारहरींशपवशी.सेंी.ळप या शासन संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर प्रक्रिया ही दि. १०/११/२०२५ या कालावधीपासून ते दि. २०/११/२०२५ पर्यंत राबविण्यात येत आहे. सदर लिलाव प्रक्रियेमध्ये निविदाधारक दि. १० नोव्हेंबर ते दिनांक १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत निविदा अर्ज दाखल करु शकतील. दि. २० नोव्हेबर २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून प्रत्यक्षरित्या लिलावाची ऑनलाईन प्रक्रिया सुरु होणार आहे. यातही सकारात्मकदृष्ट्या विचार करुन व कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन इच्छुक लिलावधारकांनी लिलाव प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केले आहे.

# १० नगर परिषद, २ नगर पंचायत निवडणूक प्रक्रिया

# पहिल्या दिवशी अचलपूर ७, चिखलदरा १ नामांकन

## पाच अर्ज नगराध्यक्ष तर तीन अर्ज नगरसेवक पदासाठी प्राप्त

**शनिवार, रविवार वगळता नामांकनाचे ५ दिवस शिल्लक**




**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती -**

जिल्ह्यातील अचलपूर, अंजनगाव सूर्जी, वरुड, दर्यापूर, चांदूरबाजार चिखलदरा, धामणगाव रेल्वे, मोर्शी, चांदूर रेल्वे आणि शेंदूरजना घाट या दहा नगर परिषद आणि धारणी आणि नांदगाव खंडेश्वर या दोन नगर पंचायतीमध्ये सोमवारपासून नामांकन प्रक्रिया सुरुझाली. मात्र नामांकनाच्या पहिल्या दिवशी अचलपूर नगरपरिषदेत सात तर चिखलदरात एक नामांकन ऑनलाइन प्राप्त झाले. यामध्ये पाच अर्ज नगराध्यक्ष पदाकरिता तर तीन अर्ज नगरसेवकांकरिता प्राप्त झाले. जिल्ह्यात निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरूवात झाली आहे. प्रशासनाकडून अचलपूर, अंजनगाव सुर्जी, वरुड, दर्यापूर, चांदूरबाजार, चिखलदरा, धामणगाव रेल्वे, मोर्शी, चांदूर रेल्वे आणि शेंदूरजना घाट या दहा नगर परिषद आणि धारणी आणि नांदगाव खंडेश्वर या दोन नगर पंचायतीमध्ये सोमवार १० नोव्हेंबरपासून नामांकन अर्ज स्वीकारल्या जात आहे. यामध्ये उमेदवारांना निवडणुकीच्या पोर्टलवर अर्ज करण्याची मुभा देण्यात आली आहे. परंतु अर्ज ऑनलाइन केल्यानंतर सदर अर्ज १७ नोव्हेंबरच्या ऑनलाइन केल्यानंतर सदर अर्ज १७ नोव्हेंबर च्याआत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे ऑफलाइन सादर करणे अनिवार्य आहे. त्याशिवाय तो अर्ज ग्राह्य धरल्या जाणार नाही. सोमवारी पहिल्या दिवशी अचलपूर नगरपरिषदेत सर्वाधिक सात नामांकन ऑनलाइन प्राप्त झाले आहेत. यामध्ये चार अर्ज नगराध्यक्ष पदा करिता तर तीन अर्ज नगरसेवकाकरिता आले आहेत. तसेच चिखलदरा नगरपरिषदेत नगराध्यक्ष पदाकरिता एकमेव अर्ज प्राप्त झाला आहे. मात्र आठ नगरपरिषदेसह दोन नगर पंचायतींमध्ये एकही अर्ज प्राप्त झाला नव्हता. शनिवार व रविवार हे दोन सुटीचे दिवस वगळता नामांकन दाखल करण्याकरिता पाच दिवस शिल्लक राहीले आहे.

कोणत्याही पक्षाने अद्याप उमेदवारी जाहीर न केल्यामुळे इच्छुकांमध्ये देखील संभ्रम आहे. त्यामुळे शेवटच्या दोन ते तीन दिवसांत उमेदवारांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

## १० नगरपरिषद, २ नगपंचायत निवडणूक

# जिप सीईओ संजिता महापात्र मुख्य निवडणूक निरीक्षक

### चार अधिकाऱ्यांवर निवडणूक निरीक्षकांची जबाबदारी, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे आदेश जारी





**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती-**

जिल्ह्यातील १० नगरपरिषद आणि २ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. यामध्ये मुख्य निवडणूक निरिक्षकांची जबाबदारी झेडपीच्या सीईओ संजिता महापात्र यांच्याकडे देण्यात आली असून १२ मतदार संघाकरिता चार अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

निवडणूक प्रक्रिया शांत, निर्भय आणि पारदर्शक पार पडावी यासाठी १० नगरपरिषद व २ नगरपंचायतींच्या निवडणुकीकरिता मुख्य निवडणुक निरिक्षकपदी सीईओ संजिता महापात्र यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच अपर जिल्हाधिकारी गोविंदा दाणेज यांना अचलपूर आणि चिखलदरा नगरपरिषदेसह धारणी नगरपंचायतची जबाबदारी देण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांच्याकडे मोर्शी, वरुड व शेंदुरजना घाट जबाबदारी नगरपरिषदांची सोपविण्यात आली आहे. जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख महेशकुमार शिंदे यांच्याकडे धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे नगरपरिषद व नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतची जबाबदारी आहे. तर जिल्हा कृषी अधीक्षक राहुल सांतपुते यांना दर्यापूर, अंजनगाव सुर्जी आणि चांदूरबाजार नगरपरिषदांचा निरीक्षक म्हणून नेमण्यात आले आहे. नियुक्त अधिकारी यांनी निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार कार्यवाही करून अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय व राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांना सादर करावयाचा आहे.

# अमरावतीत 'कचरा' संकलनाची जबाबदारी आता कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चरकडे

**विदर्भ प्रजासत्ताकदि.११अमरावती -** अखेर शहरातील कचरा विल्हेवाटीच्या कंत्राटासाठी महापालिकेने 'नवीन' शिलेदाराची निवड केली आहे. महापालिकेने सोमवारी दुपारी ४:३० वाजता आर्थिक निविदालिफाफे उघडले. यामध्ये उल्हासनगर (मीरा भाईंदर) येथील कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे सर्वात कमी दर (एल-१) असल्याने, अखेर साफसफाईचे कंत्राट देण्यात आले आहे. आर्थिक निविदा लिफाफे उघडताच, तीन कंपन्या स्पर्धेत होत्याः कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर, अर्बनएन्व्हायरो वेस्ट मॅनेजमेंट आणि पी. गोपीनाथ रेड्डी, बंगळुरू. सोमवारी आर्थिक निविदा उघडताना, कोणार्कने प्रशासनाला प्रतिटन ५,४०० हा सर्वात कमी दर



सादर केला. पी. रेड्डी यांनी ७,८२७ आणि अर्बन एन्व्हायरो वेस्टने ७,३५३ असा दर सादर केला. तीन कंपन्यांमध्ये कोणार्क कंपनीचा सर्वात कमी दर असल्याने त्यांना सात वर्षांसाठी अमरावतीचा कचऱ्याचा अर्थात शहरातील सर्व कचरा कंपोस्ट डेपोमध्ये वाहून नेण्याची जबाबदारी देण्यात आलीहोती. अमरावतीमध्ये दररोज २०० टन कचरा निर्माण होतो. या हिशेबाने त्यांना दररोज १० लाख ८० हजार रुपये मिळू शकतात.

# बच्चू कडूंची गाडी फोडेल, किंवा तोंडाला काळे फासेल त्याला तीन लाख

## विखे पाटील समर्थक प्रतीम कदम यांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अहिल्यानगर :** लोणीमधील प्रतिम कदम यांनीही प्रहार जनशक्ती पार्टीचे अध्यक्ष बच्चू कडू यांना प्रतिआव्हान दिले आहे. जो कुणी बच्चू - कडूंची गाडी फोडेल किवा त्यांना त्यांना काळे फासेल त्याला ३ लाख रुपये देण्याची घोषणा कदम यांनी केली आहे.

बच्चू कडू यांनी विखे-पाटील यांच्याविरोधात वेताल वक्तव्य करायला नको होते, असे प्रतिम कदम यांनी सुनावले आहे.

राज्यात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची मागणी होत आहे. त्यावरून आधी उपमुख्यमंत्री तसेच अर्थमंत्री अजित पवार आणि त्यानंतर राधाकृष्ण विखे-पाटील यांनी वक्तव्य करून वाद निर्माण केला.त्यावरून प्रहार संघटनेचे अध्यक्ष आणि माजी मंत्री बच्चू कडू यांनी राधाकृष्ण विखेद-पाटील यांची गाडी फोडणार्याला एक लाख रुपये देण्याची घोषणा


प्रतीक कदम पाटील

करूननव्या वादाला जन्म दिला. तर त्यावर भाजप नेत्याने बच्चू कडूंना शह देण्यासाठी २ लाख रुपये देत वाद पेटवून दिला आहे. त्यामुळे नेत्यांनी बोलण्यातील ताळमेळसोडल्याचे दिसून येत आहे. फीवरून सत्ताधारी महायुतीतील नेते वादग्रस्त वक्तव्य करत आहेत.

### दोन लाखांची ऑफर

बच्चू कडूंच्या गाडी फोडण्याच्या आवाहनानंतर भाजपदेखील आता आक्रमक झाला आहे. प्रहार जनशक्ती संघटनेचे नेते बच्चू कडू यांचे तोंड काळे करा आणि दोन लाख रुपये घेऊन जा, अशी ऑफर आता भाजपच्या एका नेत्यांने दिल्यामुळे विखे पाटील आणि बच्चूकड्यांच्यालाखांचेयुद्ध सुरूझाले आहे. राधाकृष्ण विखे-पाटील यांचे समर्थक आणि भाजपच्या ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष दादासाहेब सोनमाळी यांनी हा इशारा दिला आहे. माजी मंत्री बच्चू कडू यांनी त्यांच्याबद्दल बोलताना तोंड सांभाळावे, असे दादासाहेब सोनमाळी यांनी सुनावले आहे.

## कृषी पंपाच्या वेळापत्रकामध्ये बदल करण्यासाठी

# महावितरण कार्यालयात ठिय्या !

### हितेश साबळे यांच्या नेतृत्वात शेकडो शेतकरी धडकले महावितरण कार्यालयावर !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मोर्शी-** रब्बी हंगाम सुरू होण्याच्या सुरुवातीला पहिल्याच दिवशी महावितरण कंपनीने शेतकऱ्यांच्या शेतातील विजेचे वेळापत्रक बदलवल्या मुळे मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये रोष व्यक्त होत आहे, रात्रीचा वीज पुरवठा शेतकऱ्यांसाठी त्रासदायक ठरत असून शेतकऱ्यांच्या शेतातील रात्रीला सिंगल फेज लाईन यासह आदी समस्यांचे निराकरण करण्यासाठी हितेश साबळे यांच्या नेतृत्वात पिंपळखुटा जिल्हा परिषद



सर्कलमधील शेकडो शेतकऱ्यांनी महावितरण कार्यालयावर धडक देऊन महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधून महावितरण कार्यालयात ठिय्या मांडून शेतकऱ्यांचा विजेचा ज्वलंत प्रश्न मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली त्यावेळी हितेश साबळे, प्रशांत बुरंगे, हितेश उंदरे, ओम ढाकुलकर आकाश साबळे तसेच पिंपळखुटा सर्कलमध्ये शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.पिंपळखुटा मोठा जिल्हा परिषद सर्कल मधील महावितरण केंद्र निंभी व राजवाडी यांचे अंतर्गत येणाच्या सर्व शेतकऱ्यांच्या शेतातील कृषी पंपाची विद्युत वाहिनी चे वेळापत्रक (लोडशेडींग) मध्ये बदल करण्यात यावा. अर्थात रात्री एवजी दिवसा विद्युत पुरवठा करण्यात यावा, तसेच विद्युत वाहिनीमध्ये येणारे बिघाड, ट्रान्सफॉर्मर रिप्लेसमेंट त्वरित करून देण्यात यावे शेतकऱ्यांना रात्री ऐवजी दिवसा सुरळीत वीज पुरवठा करण्यात यावा, असे न झाल्यास सर्व शेतकरी मिळून विभागीय कार्यालय मोर्शी येथे दि. १७/११/२०२५ सोमवार ला महावितरण कार्यालयामध्ये तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस हितेश साबळे यांनी महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता यांना दिला आहे.

# राज्यस्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेचे अमरावतीत आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती-** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, अमरावती आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांनी वेस्टर्न फुटबॉल असोसिएशन, महाराष्ट्र आणि अमरावती जिल्हा फुटबॉल असोसिएशन यांच्या सहकार्याने अमरावती येथे राज्यस्तरीय शालेय फुटबॉल (१४ वर्षांखालील मुले व मुली) क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले आहे. दि. १३ ते १५ नोव्हेंबर २०२५ या दरम्यान जिल्हा परिषद सायन्सकोर मैदान आणि पोलीस फुटबॉल मैदान, अमरावती येथे ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील मुंबई, लातूर, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजी नगर, पुणे, अमरावती आणि नागपूर या आठ विभागांतून एकूण १६ संघ सहभागी होत असून, यामध्ये सुमारे ४०० पंच, अधिकारी



आणि खेळाडू यांचा समावेश असेल. या स्पर्धेतून राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ निवडण्यात येणार आहे, जो मध्य प्रदेश आणि झारखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व करेल. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांची निर्मिती करण्यात आली असून, खेळाडूंची निवास व्यवस्था विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती येथे करण्यात आली आहे. स्पर्धेचे उद्घाटन जिल्ह्यातील सनदी अधिकारी, पोलीस अधिकारी व मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे

# अभाविपने महाविद्यालये बंद केली

## १४ नोव्हेंबरला विद्यापीठावर मोर्चा

### प्रशासनासोबतची चर्चा निष्फळ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती-** अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) शैक्षणिक अडचणी सोडवण्यासाठी विद्यापीठाने कठोर पावले उचलावीत या मागणीसाठी 'महाविद्यालय बंद'ची हाक दिली होती. हे आंदोलन यशस्वी झाल्यानंतर आता १४ नोव्हेंबर रोजी विद्यापीठावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

दरम्यान, हे आंदोलन टाळण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने १० नोव्हेंबर रोजी आंदोलनकर्त्यांना चर्चेसाठी बोलावले होते. मात्र, अभाविपने विद्यापीठाचा प्रस्ताव फेटाळल्याने वाटाघाटी निष्फळ ठरल्या. यामुळे १४ नोव्हेंबरचा मोर्चा आता निश्चित झाला आहे.

विद्यापीठ प्रशासनाच्या निष्क्रिय आणि बेफिकीर कामकाजाविरोधात अभाविपसह इतर विद्यार्थी संघटनांनी वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांना माहिती दिली होती. परंतु, प्रवेश, परीक्षा आणि निकाल या तिन्ही आघाड्यांवर विद्यापीठ प्रशासनाने कोणतीही सुधारणा केली नाही, असे अभाविपचे म्हणणे आहे.

महाविद्यालय बंद आंदोलनात जिल्ह्यातील १० तालुक्यांमधील ३४ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. संघटनेच्या म्हणण्यानुसार, ७७ अभाविप कार्यकर्त्यांसह मोठ्या संख्येने विद्यार्थी या आंदोलनात सहभागी झाले होते.

विदर्भ प्रांत मंत्री पायलताई किनाके यांच्या मते, विद्यापीठाच्या निष्काळजीपणामुळे प्रवेश, परीक्षा, निकाल, अभ्यासक्रम, पदभरती, शिष्यवृत्ती आणि वसतिगृह सुविधा यांसारख्या सर्वच महत्त्वाच्या बाबींमध्ये विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे यापुढे याहून तीव्र पातळीवर लढा उभारला जाईल, असा इशारा त्यांनी दिला.महाविद्यालय बंद आंदोलनाचे नेतृत्व अमरावती विद्यापीठ मोर्चा प्रमुख रिद्धेश देशमुख, अमरावती महानगर सहमंत्री गौरी भारती, योगेश शेळके आणि संदेश उरकुडे यांनी केले.-

# ५५ कर्मचाऱ्यांसह पाच अधिकाऱ्यांचे बयाण नोंदविले

### कारागृहातील कॅन्टीनमधून मोबाईल आल्याचा संशय, कारागृहात सापडलेल्या ॲन्ड्रॉईड मोबाईलचे प्रकरण

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.११अमरावती-** अमरावती कारागृहात कैद्याकडे ॲन्ड्रॉईड मोबाईल मिळाल्या च्या प्रकरणात गुन्हेशाखेच्या पथकाने कारागृहातील ५ अधिकाऱ्यांसह ५५ कर्मचाऱ्यांचे बयाण नोंदविले. तसेच कैदी तरबेजच्या पत्नीसह त्याचा भाऊ व एका मित्राचेसुध्दा बयाण नोंदविले आहे. कारागृहातील कॅन्टीनमधून कैदी तरबेजजवळ ॲन्ड्रॉईड मोबाईल पोहचल्याचा संशय पोलिसांना आहे. त्यादृष्टीने पोलिसांनी तपासाची गती वाढविली आहे.

अमरावती कारागृहात शिक्षा भोगणारा बंदी तरबेजजवळ एक नाही तर तीन ॲन्ड्रॉईड मोबाईल सापडले होते. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून दुसऱ्या दिवशी कारागृह दक्षता समितीच्या अधिकाऱ्यांनी कारागृहाची पाहणी केली. तसेच महानिरिक्षक कारागृह व सुधारसेवा महाराष्ट्र राज्य पुणे आणि नागपूर येथील पथकाने



सुध्दा अमरावती कारागृहाची पाहणी केली. तेव्हा संबंधित बंदीजवळ आणखी एकमोबाईल सापडल्याने अधिकाऱ्यांच्या पायखालची वाळू सरकली होती. कारागृह दक्षता समितीचे अध्यक्ष पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी संबंधित प्रकरणाचा तपास गुन्हेशाखेच्या पथकाकडे सोपविला होता. गुन्हेशाखेच्या पथकाने याप्रकरणात कारागृहातील संशयीत अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोबाईल नंबर घेऊन त्यांचा सीडीआर तपासणीकरिता पाठविला होता. तपासणीमध्ये काही अधिकारी व कर्मचाऱ्यांवर संशय येत असल्याने ५ अधिकारी व ५५ कर्मचाऱ्यांचे बयाण नोंदविले. तसेच कारागृहात कॅन्टीन चालविणाऱ्या कर्मचाऱ्याला बरेचदा चौकशीकरिता बोलावून त्याची कसून चौकशी करण्यात आली. कारागृहातील कॅन्टीनमधूनच कैद्यांपर्यंत ॲन्ड्रॉईड मोबाईलपोहचल्याचा संशय तपास अधिकाऱ्याला आहे. परंतु मोबाईल बाहेरून कॅन्टीनपर्यंत कोणी आणला, याबाबत अद्यापही ठोस माहिती समोर आलेली नाही. कारागृहातील कैदी गणेश शिंदे याच्याकडेसुध्दा एक मोबाईल मिळाल्यामुळे त्याची सुध्दा पोलीस चौकशी करीत आहेत.

## विद्यापीठाच्या जीवतंत्रज्ञान विभागाची विद्यार्थीनी

# कु. पुजा मांडवीयच्या पोस्टरला बक्षिस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती-** उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत इमर्जिंग मायक्रोबायल टेक्नॉलॉजिस फॉर वन हेल्थ या थीममध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या जीवतंत्रज्ञान विभागाची संशोधक विद्यार्थीनी कु. पुजा मांडवीय हिच्या पोस्टरला प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळाले आहे. यापूर्वी सुध्दा तिला श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती तसेच वेल्लोर इन्स्टिटएुट ऑफ टेक्नॉलॉजी येथील संशोधन कार्याला बक्षिस मिळाले आहे. तिला बॉयोटेक्नॉलॉजी विभागातील प्राध्यापक डॉ. प्रशांत ठाकरे, सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील डॉ. निरज घनवटे, कु. निलू सोनी, रेणुका येंडे, वैष्णवी मरापे यांचे मार्गदर्शन लाभले. कु. पुजा हिच्या या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच जीवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. प्रसाद वाडेगावकर यांनी अभिनंदन केले आहे.




## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक

# अमरावती विभागाच्या प्रभारीपदी ॲड यशोमती ठाकूर



**विदर्भ प्रजासत्ताकदि.११अमरावती** स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर काँग्रेस पक्षाने या निवडणुकांची जोरदार तयारी सुरु केली असून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ज्येष्ठ नेत्यांची विभागीय प्रभारी म्हणून नियुक्ती आहे. यामध्ये अमरावती विभागाची जबाबदारी माजी मंत्री ॲड यशोमती ठाकूर यांच्यावर सोपविण्यात आली आहे. नागपूर विभागाची जबाबदारी विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वड्डेट्टीवार यांच्याकडे, पश्चिम महाराष्ट्राची जबाबदारी विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्याकडे सोपवली काँग्रेस आहे. वर्किंग कमिटीचे सदस्य माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडे उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा प्रभारी म्हणून माजी मंत्री आ. अमित देशमुख यांची तर कोकण विभाग प्रभारी म्हणून माजी मंत्री काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य नसीम खान यांच्यावर जबाबदारी सोपवली आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांनी दिली आहे.

# शंकरबाबांच्या 'घरा'त २९ वा नातू, मूकबधिर जोडप्याच्या बाळाला अचलपूरच्या डॉक्टरांनी दिले जीवनदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १८अचलपूर**
ज्यांना आपले म्हणायला कोणी नव्हते, ज्यांचे आयुष्य बेवारस म्हणून सुरू झाले, त्या मूकबधिर जोडप्याच्या घरात आज आनंदाचे अश्रू आणि टाळ्यांचा गजर झाला. वझ्झर येथील स्व. अंबादासपंत वैद्य मतिमंद, मूकबधिर बालगृहात वाढलेल्या अनिल आणि वैशाली या दिव्यांग दाम्पत्याला पुत्ररत्न झाले आहे. विशेष म्हणजे, प्रसूतीदरम्यान आई आणि बाळाचा जीव धोक्यात असताना, अचलपूरच्या उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी यशस्वी 'सिझेरिअन' शस्त्रक्रिया करून दोघांनाही सुखरूप वाचवले.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शंकरबाबा पापळकर यांच्या कुटुंबात आता २९ वा नातू जन्माला आला आहे, ज्यात १२ मुली आणि १७ मुलांचा समावेश आहे. वैशाली हिचा प्रवास मुंबईतील चेंबूर येथील बेवारस अवस्थेतून सुरू झाला, तर अनिल हा डोंगरी रिमांड होममध्ये होता. मुंबईच्या बाल न्यायालयाने या दोघांना अमरावती जिल्ह्यातील वझ्झर येथील शंकरबाबांच्या बालगृहात आजीवन पुनर्वसनासाठी पाठवले. ३० वर्षांहून अधिक काळ याच संस्थेच्या छत्रछायेखाली दोघे लहानाचे मोठे झाले.संस्थेने केवळ त्यांना आसराच दिला नाही, तर त्यांना जीवनसाथीही शोधून दिला. तरुण झाल्यावर ते दोघे एकमेकांच्या प्रेमात




पडले आणि लग्नबंधनात अडकण्यास तयार झाले.

फेब्रुवारी २०१९ मध्ये अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे अनिल आणि वैशाली यांचा विवाह भव्य प्रमाणात पार पडला. तत्कालीन खासदार आनंदराव अडसूळ यांनी मुलीच्या वडिलांची जबाबदारी स्वीकारली, तर तत्कालीन पोलीस आयुक्त बाविस्कर यांनी वरपिता म्हणून जबाबदारी सांभाळत या दोघांचे लग्न लावून दिले. आजपर्यंत या संस्थेने तब्बल २३ अनाथ, बेवारस मुला-मुलींचे विवाह लावून दिले आहेत. लग्नानंतर अनिल आणि वैशाली यांना संस्थेने बेवारस दिव्यांग मुलांच्या सेवेसाठी नोकरीवरही ठेवले, ज्यामुळे त्यांचे जीवन आत्मनिर्भर झाले.

लग्नाच्या सहा वर्षांनंतर सौ. वैशाली यांना गर्भधारणा झाली. परंतु, नवव्या महिन्यात त्यांची प्रकृती गंभीर झाली आणि त्या फार अशक्त झाल्या होत्या. अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी यावेळी देवदूत म्हणून काम केले. प्रसूतीची गुंतागुंत लक्षात घेऊन, डॉ. प्राजक्ता किटुकले आणि डॉ. आनंद सुंडे यांच्या चमूने तातडीने 'सिझेरिअन' शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. आज दुपारी दोन वाजता हे बाळ सुखरूप जन्माला आले.

आई वैशाली आणि बाळ दोघांचेही प्राण वाचवण्यात डॉ. किटुकले आणि डॉ. सुंडे यांना यश मिळाले. यावेळी परिचारिका गायत्री, आशा सेविका ज्योती तायडे, बालगृहाच्या वॉर्डन वर्षा काळे आणि विनायकराव काकड उपस्थित होते.

# हिवाळी अधिवेशनात 'वाहनसंकट'! आचारसंहिता लागल्यास वाहनांची जुळवाजुळव ठरणार आव्हानात्मक




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे ८ डिसेंबरपासून सुरू होत आहे. अधिवेशनासाठी सुमारे १२०० वर वाहनांची आवश्यकता भासणार आहे. दरवर्षीच वाहनांची तजवीज करताना प्रशासनाला घाम फुटतो. यंदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. याच काळात जिल्हा परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यास वाहनांची जुळवाजुळव करणे प्रशासनासाठी आव्हानात्मक ठरणार आहे.अधिवेशन काळात मंत्रालयीन अधिकारी, बांधकाम विभाग, पोलिस आणि विधिमंडळ सचिवालय यांच्यासाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणावर वाहने तैनात केली जातात. गतवर्षी १ हजार १७५ वाहने वापरली गेली होती. अनेक विभागांकडून वाहनच देण्यात येत नसल्यामुळे वेळेवर मोठी तारांबळ उडते. गत काही वर्षांचा अनुभव लक्षात घेता यंदा संबंधित विभागाने ४ हजार वाहनांची मागणी नागपूरसह अमरावती, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगरच्या महसूल विभागाकडे केली आहे.२४ नोव्हेंबरपासून वाहने जमा करण्याच्या सूचना चारही महसूल विभागांना देण्यात आल्या आहेत. साधारणत सत्राच्या पहिल्या दिवसापर्यंत शासकीय वाहने उपलब्ध होत असतात. परंतु, यंदा निवडणुकांची रेलचेल लक्षात घेता शासकीय वाहने उपलब्ध न झाल्यास ऐनवेळी खासगी वाहनांची जुळवाजुळव (अधिग्रहित) करण्याचे आव्हान प्रशासनापुढे राहणार असून, वाहनांवरील खर्चही तुलनेत वाढणार आहे.

> नागपूर, अमरावती, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या महसूल विभागांना वाहन उपलब्ध करून देण्याबाबत पत्र दिले आहे. परंतु, अधिवेशन आणि जिल्हा परिषद निवडणुकांचा कार्यक्रम ओव्हरलॅप झाल्यास शासकीय वाहनांना निवडणुकीत प्राधान्य राहील. अशावेळी खासगी वाहनांसाठी जुळवाजुळव करण्याची वेळ येईल. नागपूर विभागीय आयुक्त इतर आयुक्तांशी बोलून किमान गतवर्षाइतकी तरी वाहने उपलब्ध करून देण्याची सूचना करणार आहेत.
>
> **अविनाश हदगल, रोहयो सहआयुक्त आणि नोडल अधिकारी, अधिवेशन वाहनव्यवस्था**

# १४ नोव्हेंबर बालक दिन निमित्ताने महिलांनी केला मतिमंद विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित

## भारतीय जैन संघटना महिला आघाडीचा अनोखा पुढाकार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

सामाजिक विकास, शैक्षणिक क्षेत्र असो किंवा राष्ट्रीय पातळीवरील समस्या आदिसह विविध क्षेत्रातील सर्व बाबी तसेच विविध पैलुंचा अभ्यास करीत भारतीय जैन संघटनेच्या महिला आघाडी चे वतीने अनेक लोककल्याणकारी उपक्रम राबविल्या जातं आहे. संपूर्ण देशभरात १४ नोव्हेंबर हा दिवस बालक दिन म्हणून साजरा केला जातो. या बालक दिनाचे औचित्य साधून भारतीय जैन संघटना महिला आघाडी च्या वतीने राजापेठ परिसर स्थित स्वर्गीय दौलतभाई देसाई मतिमंद मुलांची शाळा येथे खेळणी साहित्य बँक नामक उपक्रम आयोजित करण्यात आला. प्रत्येक बालक हा हास्याचा हक्कदार आहे. मतिमंद मुलांच्या जीवनात हास्याचे तुषार फुलविण्यासाठी तसेच त्यांचे जीवन अधिकाधिक आनंदी - प्रफुल्लित करण्यासाठी यावेळी प्रत्येक महिला सदस्यांनी आपापल्या घरातील लहान मुलांची खेळणी साहित्य संकलित करून यादरम्यान मतिमंद मुलांना या खेळण्याच्या साहित्याचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी दौलतभाई देसाई मतिमंद विद्यालय चे अध्यक्ष - डॉ. शरद भोयर, विशेष शिक्षक - शालिकराम राठोड यांनी विशेष सहकार्य केल्याबद्दल त्यांचा वृक्ष रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर - राजीबाई छोटे मंदिर अध्यक्ष - हरीशजी सामरा, अंबापेठ जैन स्थानक अध्यक्ष - विपीनजी कोठारी, सचिव - कल्पेशजी देसाई, वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे सचिव - धर्मेंद्रजी मुणोत,भारतीय जैन संघटनेचे अध्यक्ष - शुभमजी जैन, भारतीय जैन संघटना महिला आघाडी माजी अध्यक्ष - मंजूदीदी ओस्तवाल, सचिव - सीमादीदी गांग, विद्यमान अध्यक्ष - नेहा चोपडा आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुरुवातीला - नेहा चोपडा यांनी खेळणी बँक या उपक्रमाची विस्तृत माहिती देऊन अतिथी मान्यवरांना अवगत केले. स्वर्गीय - जवाहरलाल चोपडा यांच्या २४ व्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून यावेळी मतिमंद मुलांना अल्पोपहाराचे व ड्रायफ्रुट्स चे वितरण करण्यात आले. मतिमंद विद्यार्थ्यांकडे केवळ सहानुभूती म्हणून न पाहता त्यांना सर्वांनी आपुलकीचे कवच प्रदान करावे. असे आवाहन करीत यावेळी भारतीय जैन संघटना महिला आघाडीच्या वतीने नमोकार मंत्राचे सामूहिक उच्चरण करण्यात आले. यासोबतच याप्रसंगी मतिमंद विद्यार्थ्यांना बिस्कीट्स, स्टेशनरी साहित्य, स्लीपर्स व पादत्राणे यांचे वितरण करण्यात आले. यावेळी भारतीय जैन समाज संघटना महिला आघाडीच्या अध्यक्ष नेहा चोपडा, सचिव - रश्मी चोपडा, कोषाध्यक्ष -पूनम सिंघवी, प्रकल्प संचालक विशिता समदरिया, वंदना कोचर, नेहा बैद, रुचिता सामरा, रिता बोकाडिया, मोनिका सावला, कविता सिंघवी, अर्चना सामरा, हेमा जैन, रूपा भंसाली, आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे समारोप प्रसंगी ज्या सर्व मान्यवरांचे हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य लाभले, त्यांचे प्रति आभार व कृतज्ञता व्यक्त करीत भारतीय जैन संघटना महिला आघाडीच्या अध्यक्ष नेहा चोपडा यांनी दिली.

# सार्सी येथील दोन शिक्षकांवर विनयभंगाची तक्रार

## ग्रामस्थांचा आरोप तक्रार खोटी, शिक्षकांना मिळावा न्याय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११तिवसा ( सार्सी)**

तिवसा तालुक्यातील ग्राम सार्सी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील सातवीत शिकणाऱ्या १३ वर्षीय विद्यार्थिनीच्या वडिलांनी दोन शिक्षकांवर विनयभंगाची तक्रार माहुली जहागीर पोलीस स्टेशनला दाखल केली आहे. या प्रकरणानंतर गावात मोठी खळबळ उडाली असून ग्रामस्थ आणि शाळा व्यवस्थापन समितीने शिक्षकांच्या समर्थनार्थ आंदोलन छेडले आहे.सकाळी १० वाजता ग्रामस्थ, विद्यार्थी आणि पालकांनी शाळेसमोर मोठी गर्दी करून आंदोलन केले. त्यांचे म्हणणे आहे की संबंधित दोन्ही शिक्षकांवर लावण्यात आलेले आरोप खोटे असून त्यांना तातडीने न्याय मिळावा.ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीने स्पष्ट केले की, जोपर्यंत शिक्षक संदीप सर आणि शुभम सर यांच्यावरच्या खोट्या तक्रारी मागे घेतल्या जात नाहीत आणि त्यांना न्याय मिळत नाही, तोपर्यंत ते आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत.दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी सुरू केली असून सत्य परिस्थिती लवकरच स्पष्ट होईल, अशी माहिती स्थानिक सूत्रांकडून मिळाली आहे.

# नागपुरात 'हाय अलर्ट', संघ मुख्यालयाच्या सुरक्षेचा अधिकाऱ्यांकडून आढावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटानंतरनागपूर पोलीस 'हाय अलर्ट'वर आहेत. शहरातील संवेदनशील भागात पोलिसांची सुरक्षा वाढविण्यात आली आहे. तसेच रात्रीच्या गस्तीत वाढ करण्यात आली आहे. याशिवाय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महालातील मुख्यालय तसेच रेशीमबाग येथील डॉ.हेडगेवार स्मृतिमंदिर परिसराच्या सुरक्षेचादेखील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रात्री आढावा घेतला.

या स्फोटानंतर रेल्वे स्थानक, बस स्टँड आणि गर्दीच्या ठिकाणी पोलिस तैनात करण्यात आले आहेत. शहरात येणाऱ्या वाहनांचीदेखील तपासणी केली जात आहे. सुरक्षा यंत्रणांकडून नागपुरसाठी विशेष अलर्ट जारी करण्यात आलेला नसला तरी पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून सर्व अधिकारी व पोलीस ठाण्यांना अलर्टवर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय दीक्षाभूमीच्या सुरक्षाव्यवस्थेचादेखील पोलिसांनी आढावा घेतला. नागपुरात संरक्षण मंत्रालयाशी निगडीत अनेक आस्थापना आहेत. त्यामुळे त्या भागांतदेखील पोलिसांची गस्त वाढविण्यात आली आहे.

रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास पोलीस उपायुक्त राहुल मदने यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी संघ मुख्यालयाच्या सुरक्षाव्यवस्थेचा आढावा घेतला. त्यांनी संघ मुख्यालयाच्या आत जाऊन केंद्रीय सुरक्षायंत्रणांच्या अधिकाऱ्यांशीदेखील चर्चा केली. संघ मुख्यालयात २४ तास सुरक्षाव्यवस्था तैनात असते. मात्र आता तिकडे जाणाऱ्या मार्गांवरदेखील सुरक्षा यंत्रणांचे लक्ष राहणार आहे.

### जिल्ह्यातील संवेदनशील भागांतदेखील बंदोबस्त वाढविला

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नागपूर जिल्ह्यातदेखील सुरक्षा वाढविण्यात आली आहे. विशेषत: संवेदनशील भागांत बारीक लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परिसरात कुठलीही संशयास्पद वस्तू आढळल्यास तातडीने पोलिसांना संपर्क करण्याचे आवाहन विविध वस्त्यांमध्ये फिरून करण्यात येत आहे. जिल्ह्यातील संपूर्ण पोलीस यंत्रणा अलर्टवर असल्याची माहिती पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी दिली.

# दान पावलं!:पंढरपूरच्या कार्तिकी वारीला भाविकांचा उदंड प्रतिसाद

## विठ्ठलाच्या चरणी ५ कोटी १८ लाखांची देणगी अर्पण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११पंढरपूर**

पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात नुकत्याच पार पडलेल्या कार्तिकी वारीत वारकऱ्यांनी आणि भाविक भक्तांनी श्रींच्या चरणी उदंड दान अर्पण केले आहे. या वर्षीच्या यात्रेत एकूण ५ कोटी १८ लाख ७७ हजार २२८ रुपये इतके उत्पन्न देवस्थान समितीच्या खात्यात जमा झाले आहे. सोन्या-चांदीच्या दागिन्यांपासून ते हुंडीपेट्यांतील रोख देणग्या, लाडू प्रसाद विक्री, भक्तनिवास शुल्क अशा विविध माध्यमातून ही देणगी प्राप्त झाली असल्याची माहिती मंदिरे समितीचे लेखाधिकारी मुकेश अनेचा यांनी दिली.

२२ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत भाविकांनी मोठ्या श्रद्धेने श्री विठ्ठलाच्या चरणी विविध स्वरूपात देणग्या अर्पण केल्या. श्रींच्या चरणाजवळील अर्पणातून ४८ लाख ८ हजार २८९ रुपये, देणगी स्वरूपात १ कोटी २७ लाख ९१ हजार ५२० रुपये, लाडू प्रसाद विक्रीतून ५४ लाख १६ हजार ५०० रुपये, तर भक्तनिवासातून ७१ लाख ५९ हजार ९१० रुपये एवढे उत्पन्न मिळाले. याशिवाय १ कोटी ७७ लाख १५ हजार २२७ रुपये हुंडीपेट्यांतून जमा झाले असून पूजा, अगरबत्ती, चंदन, फोटो, महावस्त्रे आणि मोबाईल लॉकर आदी माध्यमातूनही जवळपास ६ लाख ७० हजार रुपये उत्पन्न मिळाले. सोन्या-चांदीच्या दागिन्यांच्या स्वरूपात ३३ लाख ३६ हजार ८७६ रुपये किंमतीची अर्पण वस्तू श्रींच्या खजिन्यात जमा झाली आहे.

या वर्षीच्या उत्पन्नात मागील कार्तिकी वारीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. मागील वर्षी ३ कोटी ५७ लाख ४७ हजार ३२२ रुपये इतके उत्पन्न जमा झाले होते, तर यंदा १ कोटी ६१ लाख २९ हजार ९०६ रुपयांची वाढ नोंदवली गेली आहे. यात्रेचा कालावधी तुलनेने कमी असूनही भाविकांनी दिलेल्या प्रतिसादामुळे मंदिर समितीचे उत्पन्न विक्रमी पातळीवर पोहोचले आहे. श्रींच्या चरणी भाविकांनी अर्पण केलेल्या सोन्या-चांदीच्या वस्तूंमुळेही यंदाच्या उत्पन्नात वाढ झाली असल्याचे मंदिर प्रशासनाने सांगितले.

# ४ डिसेंबर रोजी पौर्णिमेच्या दिवशी 'सुपरमून' दिसणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**


येत्या ४ डिसेंबर रोजी पौर्णिमेच्या दिवशी 'सुपरमून' दिसणार आहे. या दिवशी पृथ्वीपासून चंद्राचे अंतर कमी राहील. त्यामुळे चंद्र या दिवशी मोठा व प्रकाशमान दिसेल. सरासरी पृथ्वी-चंद्र हे अंतर ३ लाख ८५ हजार कि.मी. असते. जेव्हा पृथ्वी-चंद्र हे अंतर ३ लाख ७० हजार कि. मी. च्या आत असते, त्यावेळी 'सुपरमून'ची स्थिती येते.

चंद्र पृथ्वीच्या जवळ आल्याने समुद्राच्या भरती-ओहोटीची तीव्रता वाढणे, वादळ यासारख्या घटना घडू शकतात. पृथ्वीवरुन आपण नेहमी चंद्राचा ५९ टक्के भाग पाहतो. चंद्रावरुन पृथ्वी ही ९८.४ टक्के दिसू शकते, चंद्रावरुन पृथ्वीवर प्रकाशकिरण येण्यास १.३ सेकंद लागतात.

चंद्राचे वय हे ४.६५ अब्ज वर्ष आहे. चंद्र हा पृथ्वीपासून दरवर्षाला ३.८ सें.मी. लांब जात आहे. त्यामुळे पृथ्वीचा फिरण्याचा वेग कमी होईल व १०० वर्षांनी दिवस हा २ मिली सेकंदने मोठा होईल. चंद्रावर ३० हजार विवरे व १२ पर्वत आहे. पर्वत व विवरे दुर्बिनीमधून अगदी चांगल्या प्रकारे पाहता येतात. ४ डिसेंबर ला संध्याकाळी दिसणारा सूपरमून खगोलप्रेमींनी आणि जिज्ञासूंनी अवश्य बघावा. हा सुपरमून अगदी साध्या डोळ्यांनी पाहता येईल, अशी माहिती मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रविण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय म. गिरुळकर यांनी दिली आहे.

पौर्णिमेच्या दिवशी चंद्र पृथ्वीच्या जवळ आला तर त्याला 'सुपरमून' म्हणतात. अशावेळी चंद्रबिंब चौदा पट मोठे व तीस टक्के जास्त प्रकाशित दिसते. पूर्ण चंद्र आपल्या नेहमीच्या आकारापेक्षा थोडा अधिक मोठा आणि तेजस्वी दिसतो. यावर्षी ७ ऑक्टोबर, ५ नोव्हेंबरला 'सुपरमून'चे आकर्षक दृश्य पाहण्याची संधी मिळाली होती.चंद्र पृथ्वीभोवती फिरताना त्याची कक्षा वर्तुळाकार नसून लंबवर्तुळाकार असते. त्यामुळे काही वेळा चंद्र पृथ्वीच्या अगदी जवळ येतो. त्यावेळी पूर्ण चंद्राच्या अवस्थेत तो सुमारे ३० टक्के तेजस्वी दिसतो. ४ डिसेंबर २०२५ च्या रात्री आकाश स्वच्छ असेल तर पूर्ण चंद्र अधिक मोठा, उजळ आणि मनमोहक स्वरूपात झळकताना दिसेल.

# मेळघाटात लाल माकडांचा धुमाकूळ पर्यटक त्रस्त अन् शेतकरी बेजार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

मेळघाटात गेल्या काही वर्षांपासून लाल माकडांची संख्या प्रचंड वाढलीय. आता वर्ष-दोन वर्षांपूर्वी धारणी मार्गावर सेमाडोह, कोलकास लगत मार्गावर दिसणारी ही लाल माकडं मेळघाटात आता सर्वत्र धुमाकूळ घालायला लागलीत. पर्यटन नगरी असणाऱ्या चिखलदरा येथे लाल माकडांच्या त्रासानं पर्यटक त्रस्त होत आहेत. गंभीर बाब म्हणजे मेळघाटातील आदिवासी शेतकरीदेखील माकडांच्या त्रासामुळे हैराण झाले आहेत.

मेळघाटात काळ्या तोंडाची माकडं अनेक वर्षांपासून आहेत. लाल तोंडाची माकडं सेमाडोह, कोलकास परिसरात आधी १५, २० च्या संख्येत दिसायची. आज मात्र चिखलदरा, सेमाडोह, कोलकास, माखला, हरिसाल, चुरणी, सलोना, भिलखेडा अशा अनेक गावांमध्ये लाल माकडांनी उच्छाद मांडलाय. लाल माकडांच्या टोळ्याच आता अनेक गावात फिरताना दिसतात. ही माकडं फार हट्टी असून, अनेक गावातील ग्रामस्थ या लाल तोंडाच्या माकडांमुळं त्रस्त झालेत.

लाल तोंडाची माकडं माणसासारखीच असतात. शेतात मक्याचं कणीस ते माणसांसारखं सोलून खातात. शेतातील टोमॅटो, काकडी सर्व फस्त करतात. शेताला असणाऱ्या तारांच्या कुंपणात विजेचा प्रवाह सोडला तर ते वीज प्रवाह असणाऱ्या तारेला स्पर्श न होऊ देता शेतशिवारात शिरतात, इतकी ती हुशार असतात, असं चिखलदरा तालुक्यातील भिलखेडा येथील शेतकरी अविंद्र बेलसरे यांनी सांगितले. एखाद्या माणसासारखे फळदेखील ही माकडं सोलून खातात, असं अविंद्र म्हणाले. शेतात शिरलेल्या लाल माकडांना हाकलून लावलं तर ते शेताच्या एका टोकावरून दुसऱ्या टोकावर पळतात. खरं तर ती माणसांची मज्जा घेत असतात. त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी दिवसभर शेतात थांबावं लागतं. आमच्या गावातच नाही तर मेळघाटात सर्वत्र या माकडांनी उच्छाद मांडलाय. ही माकडं खाण्यापेक्षा नुकसान जास्त करतात. ही लाल तोंडाची माकडं पूर्वी मेळघाटात नव्हती, असं आमचे वडील सांगतात. लाल माकडं कुठून आलीत. इकडे कोणी सोडली माहिती नाही. या माकडांसाठी दिवस रात्र शेतीची राखण करावी लागतेय, अशी गंभीर समस्यादेखील अविंद्र बेलसरे यानं मांडली.

# कुणाला धक्का तर कुणाचा मार्ग पक्का ? अमरावती महापालिकेच्या ४४ जागा महिलांसाठी

## अ. जाती १५ तर जमाती २, नामाप्रसाठी २३ जागा; मनपाच्या २२ प्रभागांचे आरक्षण जाहीर : आरक्षणाने काही सुखावले तर काही दुखावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

लवकरच होऊ घातलेल्या अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी २१ प्रभागातील प्रत्येकी चार जागांचे तर १ प्रभागातील तीन जागांचे आरक्षण मंगळवारी महापालिका आयुक्त सोम्या शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आले. या आरक्षणाने काही सुखावले तर काही दुखावले आहे. एकूण २२ प्रभागातल्या ८७ जागांपैकी अनुसूचित जाती१५, जमाती २, नागरिकाच्या मागास प्रवर्ग २३ तर उर्वरित जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित आहे. विशेष म्हणजे एकूण जागांपैकी ४४ जागा सर्व प्रवर्गातील महिलांसाठी राखीव आहेत.

प्रभाग निहाय आरक्षण पुढील प्रमाणे, प्रभाग १ - शेगांव-रहाटगांव (अ) अ.जा. महिला राखीव, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग २ - संत गाडगेबाबा पीडीएमसी (अ) अ.जा., (ब) ना.मा.प्र. महिला राखीव, (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग ३ - नवसारी (अ) अ.जा. महिला राखीव, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग ४ - जमिल कॉलनी - लालखडी (अ) ना.मा.प्र., (ब) सर्वसाधारण महिला राखीव, (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग ५ - महेंद्र कॉलनी - नवीन कॉटन मार्केट (अ) अ.जा., (ब) ना.मा.प्र. महिला राखीव, (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग ६ - विलास नगर - मोरबाग -गवळीपूरा (अ) अ.जा., (ब) ना.मा.प्र. महिला राखीव, (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग ७ - जवाहर स्टेडीयम (अ) अ.जा. महिला राखीव, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग ८ - जोग स्टेडीयम - चपराशीपुरा (अ) अ.जा. महिला राखीव, (ब) अ.जमाती, (क) ना.मा.प्र. महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग ९ - एसआरपीएफ - वडाळी (अ) अ.जा., (ब) अ.जमाती महिला राखीव, (क) सर्वसाधारण महिला राखीव, प्रभाग १० - बेनोडा भिमटेकडी - दस्तुर नगर (अ) अ.जा. महिला राखीव, (ब) ना.मा.प्र. महिला राखीव, (क) सर्वसाधारण, (ड) सर्वसाधारण, प्रभाग ११ - फ्रेजरपुरा - रुख्मीणी नगर (अ) अ.जा. महिला राखीव, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग १२ - स्वामी विवेकानंद कॉलनी - बेलपूरा (अ) अ.जा., (ब) ना.मा.प्र. महिला राखीव, (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग १३ - अंबापेठ - गोरक्षण - नमुना (अ) ना.मा.प्र., (ब) सर्वसाधारण महिला राखीव, (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग १४ - जवाहर गेट - बुधवारा (अ) ना.मा.प्र., (ब) सर्वसाधारण महिला राखीव, (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग १५ - छाया नगर - पठाणपुरा (अ) ना.मा.प्र. महिला राखीव, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग १६ - अलिम नगर - रहेमत नगर (अ) ना.मा.प्र. महिला राखीव, (ब) सर्वसाधारण महिला राखीव, (क) सर्वसाधारण, (ड) सर्वसाधारण, प्रभाग १७ - गडगडेश्वर - रवि नगर (अ) अ.जा., (ब) ना.मा.प्र. महिला राखीव, (क) सर्वसाधारण महिला राखीव, (क) सर्वसाधारण, प्रभाग १८ - राजापेठ - श्री संत कंवरराम (अ) ना.मा.प्र. महिला राखीव, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग १९ - साई नगर - अकोली (अ) ना.मा.प्र., (ब) सर्वसाधारण महिला राखीव, (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग २० - सुतगिरणी - सामरा नगर (अ) अ.जा., (ब) ना.मा.प्र. महिला राखीव, (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग २१ जुनी वस्ती बडनेरा (अ) अ.जा. महिला राखीव, (ब) ना.मा.प्र. महिला राखीव, (क) सर्वसाधारण, (ड) सर्वसाधारण, प्रभाग २२ नवी वस्ती बडनेरा (अ) अ.जा. महिला राखीव, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारणसाठी राखीव आहे. amravati-municipal-corporation आरक्षण जाहीर होतात इच्छुकाची मोर्चेबांधणी जोरात सुरू झाली आहे.











# नांदगाव पेठ सर्कलमध्ये भाजपच्या पाच महिला दावेदार; नेमकी तिकीट कुणाला? कोण लढणार अपक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि११नांदगाव पेठ**



मनीषा गुल्हाने वृषाली इंगळे स्वाती यावले वनिता चिरडे योगेश्वरी इंगळे

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचे आरक्षण जाहीर होताच अमरावती जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले आहे. नांदगाव पेठ जिल्हा परिषद सर्कल 'महिला (सर्वसाधारण)' म्हणून आरक्षित झाल्यानंतर तर या भागात राजकारणाचा फिव्हर चांगलाच वाढला आहे. राजकारणात सक्रिय असलेल्या अनेक पुरुष कार्यकर्त्यांनी आपल्या अर्धांगिनींना रिंगणात उतरवून थेट निवडणुकीच्या मैदानात प्रवेश करून दिला आहे. परिणामी भाजपमध्येच तिकीटासाठी प्रचंड चुरस निर्माण झाली असून, या सर्कलमधून पाच महिला उमेदवारांचा दावा पुढे आला आहे. मागील पंधरा वर्षांपासून भाजपशी एकनिष्ठ राहून संघटनात्मक पातळीवर काम करणारे आणि यापूर्वी जिल्हा सरचिटणीस व उपाध्यक्ष पद भूषविलेले विवेक गुल्हाने यांनी मागील निवडणुकीत एसटी आरक्षण असतांना भारती गेडाम यांच्या माध्यमातून या सर्कलमध्ये कमळ फुलविले होते.सर्वसामान्यांशी जुळलेली नाळ, गोरगरीब, वंचित व प्रत्येक घटकाला मदत करणारे व्यक्तिमत्व असलेले विवेक गुल्हाने यांच्या पत्नी मनीषा गुल्हाने यांनी यंदा जनसंपर्काचा धडाका लावत निवडणूक तयारीला सुरुवात केली आहे. सामाजिक उपक्रम आणि महिलांमधील संपर्क वाढवून त्या पक्षाचा प्रभाव अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करीत आहेत.माहुली जहागीर ची लेक अशी त्यांची ओळख आहे.शिवाय विवेक गुल्हाने यांनी मागील पंधरा वर्षात सर्कल मध्ये जनसंपर्क वाढवून तसेच गोरगरीब, पीडित,रुग्ण आदींसाठी सामाजिक भावनेने कार्य करून ते सर्व जाती धर्मामध्ये सुपरिचित आहे तसेच खा. अनिल बोंडे, आ. राजेश वानखडे यांचे निकटवर्तीय असल्यामुळेत्यांनी या तिकिटावर सक्षम दावा केला आहे. दुसरीकडे माहुली जहागीर येथील भाजप किसान मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज यावले यांनी सुद्धा आपली पत्नी स्वाती यावले यांना रिंगणात उतरवून तिकीटासाठी जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. तंटामुक्त समिती अध्यक्ष म्हणून काम केलेल्या यावले दांपत्याचा स्थानिक पातळीवर मजबूत जनसंपर्क असल्याने त्यांनी केलेली दावेदारी लक्ष वेधून आहे.नांदगाव पेठमधील भाजपचे जुने कार्यकर्ते आणि युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तसेच सध्या प्रदेश कार्यकारिणी सदस्य असलेले सचिन इंगळे यांनी आपल्या पत्नी योगेश्वरी इंगळे यांना उमेदवारीसाठी पुढे केले आहे. इंगळे यांच्या दीर्घकालीन कार्यामुळे त्यांचा पक्षात मजबूत आधार असून, मतदारसंघातही त्यांचा चांगला प्रभाव आहे.शासकीय योजना घराघरात पोहचविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतलेला आजवर चार हजार लाभार्थ्यांना त्यांनी योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. तर प्रा. मोरेश्वर इंगळे यांच्या पत्नी वृषाली इंगळे यांनी सुद्धा निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला आहे. वृषाली इंगळे या विद्यमान ग्रामपंचायत सदस्य असून त्यांचा वैयक्तिक जनसंपर्क दांडगा आहे.प्रा. मोरेश्वर इंगळे यांनी मतदार संघात जनसंपर्क वाढविला असून नांदगाव पेठ मध्ये विकासात्मक कामे देखील केलेली आहेत. मंत्रालयातून थेट विकासकामे मंजूर करून आणले तसेच दहा किलोमीटर चे पांदण रस्ते देखील मंजूर करण्यात आले आहे. भाजपच्या तिकिटावर निवडणुकीची संधी मिळेल, असा त्यांना ठाम विश्वास आहे. त्याचबरोबर भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे जिल्हाध्यक्ष राजू चिरडे यांनी सुद्धा आपल्या पत्नी वनिता चिरडे यांना रिंगणात उतरविले आहे. पक्षात सक्रियता, आणि स्थानिक संघटनांमध्ये प्रभाव या जोरावर त्यांनीही उमेदवारीसाठी दावेदारी केली आहे.या पाचही दावेदार महिला भाजपच्या तिकिटासाठी प्रयत्नशील असून प्रत्येकाच्या पाठीशी त्यांचे पती कार्यकर्त्यांचा मजबूत गट, संघटनात्मक अनुभव आणि सामाजिक कार्याचा पाया घेऊन उभे आहेत. त्यामुळे या सर्कलमध्ये तिकीट कोणाच्या वाट्याला येणार आणि कोण अपक्ष म्हणून मैदानात उतरणार, हे सांगणे सध्या कठीण आहे. मात्र या सर्व स्पर्धेमुळे नांदगाव पेठ सर्कल हा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतील सर्वाधिक चर्चेचा व चुरशीचा केंद्रबिंदू ठरला आहे.

# उत्तर भारतात अतितीव्र थंडीची लाट; राज्यात 'या' भागात थंडीचा कडाका आणखी वाढण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**




उत्तर भारतातील थंड, कोरडे, उत्तरी वारे थेट सोलापूरपर्यंत झेपावल्यामुळे सोमवारी जेऊर (ता. करमाळा) येथे रविवारपेक्षा किमान तापमान घट होऊन अतितीव्र थंडीची लाट जाणवली.

सोमवारी तेथील किमान तापमान ९ अंश सेल्सिअसपर्यंत घटले. हे तापमान सरासरीच्या १४ अंश सेल्सिअसने खाली आहे. तर मुंबईचे किमान तापमान १९ अंश सेल्सिअस नोंदविले गेले असून, उन्हाचा तडाखा तुलनेने कमी झाला आहे. रात्री आणि पहाटेच्या हवेत गारवा आल्याने मुंबईला किंचित का होईना दिलासा मिळाला. जळगावला पुन्हा रविवारपेक्षा तापमानात घसरण होऊन ९.४ अंश इतके किमान तापमान नोंदवले गेले.

ते सरासरीच्या ६.४ अंशांनी खाली आहे. त्यामुळे तेथे थंडीची लाट अनुभवली गेली. जळगावचे कमाल तापमानही २९.८ अंश नोंदवले गेले. ते सरासरीच्या ३.७ अंशने कमी झाले आहे.हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी सांगितले की, अहिल्यानगर, छ. संभाजी नगर, बीड, डहाणू, नाशिक, नंदुरबार, नांदेड, सांगली या शहरांबरोबरच विदर्भातील शहरात थंडीच्या लाटेसदृश्य स्थिती अनुभवली गेली.

### विदर्भात यलो अलर्ट जारी

१२ आणि १३ नोव्हेंबर रोजी विदर्भासाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे. हवामान तज्ज्ञ उमाशंकर दास यांनी दिलेल्या माहितीनुसार, या कालावधीत रात्रीचे तापमान मोठ्या प्रमाणात घटेल. १५ आणि १६ नोव्हेंबर रोजी वातावरण थंड राहणार असले तरी कोणताही नवीन इशारा देण्यात आलेला नाही. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा या भागांमध्येही थंडीचा जोर वाढत असून, पहाटेच्या वेळी गारठा जाणवतो आहे. दुपारच्या वेळी थोडे उष्ण वातावरण, तर रात्री कडाक्याची थंडी अशी दिवस-रात्र तापमानातील मोठी तफावत सध्या अनुभवायला मिळत आहे.

# विविध पक्षाच्या शेकडो पदाधिकारी कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस श.प.पक्षात प्रवेश

## हर्षवर्धन देशमुख व प्रा. डॉ.हेमंत देशमुख यांच्या नेतृत्वावर दाखवला भरोसा : रा.काँ.शरदचंद्र पवार पक्षाचा मास्टर स्ट्रोक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**



ऐन निवडणुकीच्या तोंडावर विविध पक्षाच्या शंभर पेक्षा अधिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश घेऊन कार्यकर्त्यांनी जेष्ठ नेते हर्षवर्धन देशमुख आणि शहर जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ. हेमंत देशमुख यांच्या नेतृत्वावर भरोसा दाखवला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी विविध पक्षांमध्ये निवडणूक तयारी जोरात सुरू असतानाच अमरावती शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात घेतलेला पक्षप्रवेश हा शहरातील इतर पक्षांसाठी मोठा धक्का ठरलाय. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी कामगार सेलचे प्रदेश सरचिटणीस प्रफुल्ल डोंगरे, प्रदेश सरचिटणीस निखिल देशमुख,शेख फारुख अहमद यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांच्या पुढाकारातून १३५ कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्ष प्रवेश केला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते हर्षवर्धन देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ.हेमंत देशमुख,जेष्ठ नेते गणेश रॉय,महिला शहर जिल्हाध्यक्ष वर्षाताई भटकर,युवक शहर जिल्हाध्यक्ष रोशन कडू, मंगेश भटकर,तेजस्वी बारबदे, सय्यद मन्सूर, मोबिन माजीद, विशाल बोरखडे, सतीश चरपे,अरबाज पठाण,यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन विपुल चांदे यांनी केले. यावेळी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पक्ष बळकटीसाठी प्रयत्न करा

आज मोठ्या प्रमाणात शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. हा पक्षप्रवेश संघटन मजबुतीसाठी आणि पक्षाच्या बळकटीसाठी फायद्याचा ठरेल. त्या दिशेने सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. येणाऱ्या निवडणुकीत आपल्या पक्षाला जास्तीत जास्त फायदा होईल यासाठी सर्वांनी कामाला लागावे आणि अधिक जागा कशा जिंकता येईल यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन करत ज्येष्ठ नेते हर्षवर्धन देशमुख यांनी पक्ष प्रवेश केलेल्या सर्वांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### पक्षप्रवेशासाठी इच्छुकांची संख्या मोठी

पक्षनिष्ठ आणि प्रामाणिकपणा हेच कार्यकर्त्यांचे ध्येय असले पाहिजे. निवडणुकांमध्ये मोठ्या जोमाने प्रयत्न करून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला विजय मिळाला पाहिजे. आपल्या वरिष्ठ नेत्यांवर विश्वास असल्याने अनेकांनी पक्ष प्रवेश केला.सोबतच इतरही पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी पक्ष प्रवेश करण्यासाठी इच्छुक आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये सर्वांना न्याय देण्याची भूमिका आहे इथे कोणावरही अन्याय होणार नाही अशी ग्वाही शहर जिल्हाध्यक्ष डॉ.हेमंत देशमुख यांनी दिली.

# दिल्लीहून येणाऱ्या गाड्यांमध्ये कसून तपासणी

**नागपूरसह, बडनेरा, अकोला, वर्धा, सेवाग्राम बल्लारशाह स्थानकाला हाय अलर्ट**



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

भीषण बॉम्ब स्फोटानंतर दिल्लीहून नागपूरसह विविध भागात जाणाऱ्या रेल्वे गाड्यांमध्ये स्पेशल पार्ट्यांकडून कसून तपासणी केली जात आहे. त्याच प्रमाणे नागपूरसह विदर्भातील आठ रेल्वे स्थानकांना हाय अलर्ट देण्यात आला आहे. या सर्व रेल्वे स्थानकावर बॉम्बशोधक आणि नाशक पथकांकडून कसून तपासणी केली जात आहे.

सोमवारी रात्री दिल्लीच्या लाल किल्ल्याजवळ धावत्या आय ट्वेंटी कार मध्ये भीषण बॉम्बस्फोट झाला. या स्फोटाचे आरोपी शोधण्यासाठी तपास यंत्रणा वेगवेगळे अँगल तपासत आहेत दिल्लीहून नागपूर आणि देशाच्या इतर भागाला जाणाऱ्या रेल्वे गाड्यांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणच्या स्पेशल पार्टीज (तपास पथके) शिरले असून त्यांनी संशयितांची चौकशी चालवली आहे.

या भीषण स्फोटानंतर भारताचे हृदयस्थळ असलेल्या नागपूर-विदर्भालाही अति सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, नागपूरच्या मुख्य रेल्वे स्थानकासह, अजनी आणि इतवारी तसेच वर्धा, सेवाग्राम, बल्लारशाह, बडनेरा आणि अकोला रेल्वे स्थानकाला देण्यात आला आहे. त्यामुळे नमूद सर्व रेल्वे स्थानकावर रात्रीपासून विशेष तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. नमूद स्थानकांवर, अतिरिक्त बंदोबस्त लावण्यात आला आहे. श्वान तसेच बॉम्बशोधक आणि नाशक पथकांकडून कसून तपासणी सुरू करण्यात आली आहे. प्रतीक्षालयासोबतच पार्किंगच्या ठिकाणी असलेल्या गाड्यांचीही तपासणी केली जात आहे.रेल्वे पोलीस अधीक्षक मंगेश शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, रेल्वेतील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांच्या सुट्या रद्द करण्यात आल्या असून त्यांना तातडीने कर्तव्यावर परत येण्याचे आदेश देण्यात आले आहे.

### रेल्वे स्थानकांवर विशेष सुरक्षा

रेल्वे सुरक्षा दलाचे आयुक्त मनोज कुमार यांनी लोकमतला दिलेल्या माहितीनुसार, दिल्लीहून परतणाऱ्या गाड्यांची खास तपासणी केली जात आहे. मध्य रेल्वेच्या क्षेत्रात येणाऱ्या महत्त्वाच्या सर्व रेल्वे स्थानकांवर विशेष सुरक्षा लावण्यात आली असून तपासणी मोहीम कडक करण्यात आली आहे. सीसीटीव्हीवर सूक्ष्म नजर रोखण्यात आली आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत